कर्नाटक सरकार

माय–मराठी

इयत्ता सातवी

मराठी प्रथम भाषा पाठ्यपुस्तक



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

MARATHI FIRST LANGUAGE

Part - 1

REVISED

KARNATAKA TEXT BOOK SOCIETY (R.)
6th Cross, Malleshwaram,
Bangalore - 560 003.

PREFACE

The Textbook Society, Karnataka has been engaged in producing new textbooks according to the new syllabi which in turn are designed on NCF – 2005 since June 2010. Textbooks are prepared in 12 languages; sof them serve as the media of instruction. From standard 1 to 4 there is the EVS, mathematics and 5th to 10th there are three core subjects namely mathematics, science and social science.

NCF – 2005 has a number of special features and they are:

- connecting knowledge to life activities.
- learning to shift from rote methods.
- enriching the curriculum beyond textbooks.
- learning experiences for the construction of knowledge.
- making examinations flexible and integrating them with classroom experiences.
- caring concerns within the democratic policy of the country.
- making education relevant to the present and future needs.
- softening the subject boundaries- integrated knowledge and the joy of learning.
- the child is the constructor of knowledge.

The new books are produced based on three fundamental approaches namely.

Constructive approach, Spiral Approach and Integrated approach.

The learner is encouraged to think, engage in activities, master skills and competencies. The materials presented in these books are integrated with values. The new books are not examination oriented in their nature. On the other hand they help the learner in the all round development of his/her personality, thus help him/her become a healthy member of a healthy society and a productive citizen of this great country, India.

The most important objectives of teaching language are listening, speaking, reading, writing and reference work. These skills have been given a lot of importance in all the language textbooks. Along with the inculcation of these skills, fundamental grammar, opportunities for learners to appreciate beauty and imbibe universal life values have been integrated in language textbooks. When learners master these competencies, they would

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

stop studying textbooks for the sake of passing examinations. In order to help learners master these competencies, a number of paired and group activities, assignments and project work have been included in the textbooks. It is expected that these activities would help learner master communicative skills. Ultimately, it is expected that students master the art of learning to learn and make use of these competencies in real life.

The Textbook Society expresses grateful thanks to the chairpersons, writers, scrutinisers, artists, staff of DIETs and CTEs and the members of the Editorial Board and printers in helping the Text Book Society in producing these textbooks. A few works of some writers and poets have been included in these textbooks. The textbook society is extremely grateful to them for giving their consent for the inclusion of these pieces in the textbooks.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

Nagendra Kumar
Managing Director
Karnataka Textbook Society®
Bengaluru, Karnataka

Prof G S Mudambadithaya
Coordinator
Curriculum Revision and Textbook Preparation
Karnataka Textbook Society®
Bengaluru, Karnataka

हितगुज

मित्रहो,

विद्यार्थ्यांना आज आत्मविश्वासाची अतिशय गरज आहे. विद्यार्थ्यांत तो आत्मविश्वास वाढावा, विद्यार्थी नवतंत्रज्ञानाशी एकरूप होत असताना त्यांच्यात उत्तम नागरिक बनण्याची लक्षणे, राष्ट्रप्रेम व नैतिकता वाढावी यासाठी राष्ट्रीय पातळीवर एन्.सी.ई.आर.टी. ने 'नॅशनल करिक्युलम फ्रेम वर्क २००५' तयार केले आहे. या 'एन्.सी.एफ् २००५' च्या तत्त्वावर आधारित हे पाठ्पुस्तक तुमच्या हाती देताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे.

शैक्षणिक जीवनात इतर विषय शिकण्यासाठी भाषा हा विषय मूलभूत पाया आहे. आत्मविश्वास वाढविण्यासाठी एक महत्वाचे माध्यम आहे हे ध्यानात घेणे आवश्यक आहे. वारकरी सांप्रदायात संतांच्याबद्दल बोलताना असे म्हटले जाते की, 'ज्ञानदेवे रचिला पाया तुका झालासे कळस' त्या प्रमाणे आपल्या जीवनातील ज्ञानाचा कळस उंचावर जाऊन तळपत रहावा म्हणून भाषेचा पाया तितकाच मजबूत असणे आवश्यक आहे. गणित, विज्ञान, समाज विज्ञान हे विषय उत्तम प्रकारे समजायला भाषा विषयावर प्रभुत्व असणे अतिशय गरजेचे आहे. भाषेचे आकलन न झाल्याने, शब्दसामर्थ्य कमी असल्याने इतर विषय समजणे कठीण जाते असे एक महत्वाचे निरीक्षण तज्ञांनी नोंदविले आहे. हे विचार मनाशी निश्चित करून पाठ्यपुस्तक रचना मंडळाने पाठांचे नियोजन व कवितांची निवड केली आहे. या इयत्तेतील विद्यार्थ्यांची मानसिक, वैचारिक पातळी लक्षात घेऊन त्यांच्यातील भाषा कौशल्य वाढवावीत यासाठी विविध उपक्रम, भाषा विषयक खेळ यांचा समावेश केला आहे. भाषा शिकताना आवश्यक ऐकणे, बोलणे, वाचणे, लेखणे आणि या चारही क्षेत्रांच्या विकासासाठी त्यांचे योग्य असे प्रमाण ठेवले आहे.

विद्यार्थ्यांनी यात स्वतः मनःपूर्वक सहभागी व्हावे आणि प्रत्येक पाठ आवडीने शिकावा, त्यांच्यातील भाषेच्या कौशल्यांचा विकास व्हावा. जुने व नवीन, ग्रामीण व शहरी भाषा यातील फरक जाणून शहरी तसेच ग्रामीण भागातील सर्व विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने, दृढतेने, धैर्याने अभ्यास करावा व नवज्ञानाशी एकरूप व्हावे असे वाटते.

दर महिन्यात घेतल्या जाणाऱ्या शैक्षणिक सभामधून आलेल्या सूचनांचा अम्मल करण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. आमच्या या प्रयत्नांचे विद्यार्थी, शिक्षक, शिक्षणप्रेमी व पालक मनापासून स्वागत करतील, अशी अपेक्षा आहे. कोणत्याही विधायक सूचना केल्यास पाठ्यपुस्तक निर्देशनालय त्याचे मनापासून स्वागत करेल.

पाठ्यपुस्तक रचना कार्यामध्ये वेळोवेळी मार्गदर्शन व योग्य सल्ला देत आलेले अधिकारीवर्ग तसेच शिक्षक बंधूभगिनी, त्याच प्रमाणे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या सहकार्य केलेल्या सर्वांचे, पाठ्यपुस्तक मंडळ मनःपूर्वक आभारी आहे.

पाठ्यपुस्तक मंडळ

© KTRS NOT TO BE REPUBLISHED

Text Book Committee

Chairman :

1) **Sri R.G. Kulkarni,** A.M. (Retd.), Khanapur Tq., Belagavi Dt.

Members :

1) **Smt. P.S. Negnalkar,** H.M. (Retd.), Belagavi.
2) **Sri M.K. Birje,** H.M. Govt. Higher Pry. Marathi School Kallehol, Tal. Belagavi.
3) **Sri V.B. Gurav,** A.M., Govt. Higher Pry. Marathi School, Halsiddhanathnagar, Soundalga, Nippani.
4) **Sri P.L. Bhatkande,** A.M. Govt. Higher Pry. Marathi School, Benkanhalli, Tal. Belagavi.

Artist :

6) **Sri A.M. Badiger,** Art Master, Gandhi Vidyalaya High School, Nagshettihalli, Bengaluru - 94.

Scrutinizer :

7) **Dr. Amrut Yardi,** H.O.D. Marathi, Karnataka Arts College, Dharwad.

Chief Co-ordinator :

Prof. G.S. Mudambadithaya, Curriculum Revision and Text Preparation, Karnataka Textbook Society, Bengaluru.

Chief Advisers :

Sri Y.T. Gurumurthy, Managing Director, KTBS, Bengaluru.

Sri Bellasetty, Joint Director, KTBS, Bengaluru.

Programme Co-ordinator:

Smt. Chandrakala, A.D.P.I., KTBS, Bengaluru.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

ಪರಿಷ್ಕರಣೆ ಕುರಿತು

ಒಂದರಿಂದ ಹತ್ತನೇ ತರಗತಿಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಬಗ್ಗೆ ಪ್ರಕಟಗೊಂಡ ಸಾರ್ವಜನಿಕ ಅಭಿಪ್ರಾಯಗಳನ್ನು ಗಮನಿಸಿ ಮಾನ್ಯ ಮುಖ್ಯಮಂತ್ರಿಯವರೂ ಅರ್ಥಸಚಿವರೂ ಆಗಿರುವ ಶ್ರೀ ಸಿದ್ದರಾಮಯ್ಯನವರು ತಮ್ಮ 2014–15 ರ ಬಜೆಟ್‌ನಲ್ಲಿ ತಜ್ಞರ ಸಮಿತಿಯನ್ನು ರಚಿಸುವ ಘೋಷಣೆ ಮಾಡಿದರು. ತಜ್ಞರು ಅನುಸರಿಸಬೇಕಾದ ಮೂಲ ಆಶಯವನ್ನು ಹೀಗೆ ಹೇಳಿದರು: "ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಸಾಮಾಜಿಕ ಸಾಮರಸ್ಯ, ನೈತಿಕಮೌಲ್ಯಗಳು, ವ್ಯಕ್ತಿತ್ವವಿಕಸನ, ವೈಜ್ಞಾನಿಕ ಮತ್ತು ವೈಚಾರಿಕ ಮನೋಭಾವ, ಜಾತ್ಯತೀತತೆ ಮತ್ತು ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಬದ್ಧತೆಗಳಿಗೆ ಅನುವಾಗುವಂತೆ ತಜ್ಞರ ಸಮಿತಿಯನ್ನು ಪುನರ್ ರಚಿಸಲಾಗುವುದು" – ಇದು ಬಜೆಟ್ ಭಾಷಣದಲ್ಲಿ ಸಾದರಪಡಿಸಿದ ಆಶಯ.

ಆನಂತರ ಶಿಕ್ಷಣ ಇಲಾಖೆಯು ಒಂದರಿಂದ ಹತ್ತನೇ ತರಗತಿಯವರೆಗಿನ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಪರಿಷ್ಕರಣೆಗಾಗಿ 27 ಸಮಿತಿಗಳನ್ನು ರಚಿಸಿ ದಿನಾಂಕ: 24.11.2014 ರಂದು ಆದೇಶಹೊರಡಿಸಿತು. ಈ ಸಮಿತಿಗಳು ವಿಷಯವಾರು ಮತ್ತು ತರಗತಿವಾರು ಮಾನದಂಡಕ್ಕನುಗುಣವಾಗಿ ರಚಿತವಾದವು. ವಿವಿಧ ಪಠ್ಯವಿಷಯಗಳಿಗೆ ಸಂಬಂಧಿಸಿದ ತಜ್ಞರು, ಅಧ್ಯಾಪಕರು ಈ ಸಮಿತಿಗಳಲ್ಲಿದ್ದಾರೆ. ಈಗಾಗಲೇ ಲಿಖಿತವಾಗಿ ಬಂದಿರುವ ಅನೇಕ ಆಕ್ಷೇಪಗಳು ಮತ್ತು ವಿಶ್ಲೇಷಣೆಗಳನ್ನು ಪರಿಶೀಲಿಸಿ, ತಪ್ಪು ಒಪ್ಪುಗಳ ಬಗ್ಗೆ ನಿರ್ಣಯಿಸಿ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಪರಿಷ್ಕರಿಸುವ ಹೊಣೆಹೊತ್ತ ಈ ಸಮಿತಿಗಳಿಗೆ 'ಅಗತ್ಯವಿದ್ದಲ್ಲಿ ಪಠ್ಯವಸ್ತುವನ್ನು ಪರಿಷ್ಕರಿಸಿ ನಂತರ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಪರಿಷ್ಕರಿಸುವ' ಸ್ವಾತಂತ್ರ್ಯವನ್ನು 24.11.2014ರ ಆದೇಶದಲ್ಲೇ ನೀಡಲಾಗಿತ್ತು. ಆನಂತರ 19.09.2015 ರಂದು ಹೊಸ ಆದೇಶ ಹೊರಡಿಸಿ 'ಅಗತ್ಯವಿದ್ದಲ್ಲಿ ಪುನರ್ ರಚಿಸುವ' ಸ್ವಾತಂತ್ರ್ಯವನ್ನು ನೀಡಲಾಯಿತು. ಹೀಗೆ ಸಮಗ್ರ ಪರಿಷ್ಕರಣೆಗೊಂಡ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು 2016–17 ರ ಬದಲು 2017–18ನೇ ಶೈಕ್ಷಣಿಕ ವರ್ಷದಲ್ಲಿ ಜಾರಿಗೊಳಿಸಲಾಗುವುದೆಂದು ಇದೇ ಆದೇಶದಲ್ಲಿ ತಿಳಿಸಲಾಯಿತು.

ಅನೇಕ ವ್ಯಕ್ತಿಗಳೂ ಸಂಘಟನೆಗಳೂ ಸ್ವಯಂಪ್ರೇರಿತರಾಗಿ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಮಾಹಿತಿದೋಷ, ಆಶಯದೋಷಗಳನ್ನು ಪಟ್ಟಿಮಾಡಿ ಶಿಕ್ಷಣ ಸಚಿವರಿಗೆ, ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘಕ್ಕೆ ಕಳುಹಿಸಿದ್ದರು. ಅವುಗಳ ಪರಿಶೀಲನೆಮಾಡಿದ್ದಲ್ಲದೆ, ಸಮಿತಿಗಳಾಚೆಗೆ ಅನೇಕ ಸಂವಾದಗಳನ್ನು ಏರ್ಪಡಿಸಿ ವಿಚಾರ ವಿನಿಮಯ ಮಾಡಿಕೊಂಡಿದ್ದೇವೆ. ಪ್ರಾಥಮಿಕ ಮತ್ತು ಪ್ರೌಢಶಾಲಾ ಅಧ್ಯಾಪಕರ ಸಂಘಗಳ ಜೊತೆ ಚರ್ಚಿಸಿದ್ದಲ್ಲದೆ ಪ್ರಶ್ನಾವಳಿ ಸಿದ್ಧಪಡಿಸಿ ಅಧ್ಯಾಪಕರಿಗೆ ಕಳಿಸಿ ಅಭಿಪ್ರಾಯಗಳನ್ನು ಸಂಗ್ರಹಿಸಲಾಗಿದೆ. ಅಧ್ಯಾಪಕರು, ವಿಷಯಪರಿವೀಕ್ಷಕರು ಮತ್ತು ಡಯಟ್ ಪ್ರಾಂಶುಪಾಲರ ಪ್ರತ್ಯೇಕ ಸಭೆಗಳನ್ನು ನಡೆಸಿ ವಿಶ್ಲೇಷಣಾತ್ಮಕ ಅಭಿಮತಗಳನ್ನು ಪಡೆಯಲಾಗಿದೆ. ವಿಜ್ಞಾನ, ಸಮಾಜವಿಜ್ಞಾನ, ಗಣಿತ, ಭಾಷೆ ಸಾಹಿತ್ಯಗಳಿಗೆ ಸಂಬಂಧಿಸಿದ ತಜ್ಞರಿಗೆ ಮೊದಲೇ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಕಳುಹಿಸಿ ಆನಂತರ ಸಭೆ ನಡೆಸಿ ಚರ್ಚಿಸಲಾಗಿದೆ. ಮಹಿಳಾ ಸಂಘಟನೆ ಹಾಗೂ ವಿಜ್ಞಾನ ಸಂಬಂಧಿ ಸಂಸ್ಥೆಗಳನ್ನು ಆಹ್ವಾನಿಸಿ ಚಿಂತನೆ ನಡೆಸಲಾಗಿದೆ. ಹೀಗೆ ಎಲ್ಲಾ ಮೂಲಗಳಿಂದ ಪಡೆದ ಅರಿವಿನ ಆಧಾರದ ಮೇಲೆ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಅಗತ್ಯವಿದ್ದಕಡೆ ಪರಿಷ್ಕರಿಸಲಾಗಿದೆ.

NOT TO BE REPUBLISHED © KSCERT

ಬಹುಮುಖ್ಯವಾದ ಇನ್ನೊಂದು ಸಂಗತಿಯನ್ನು ಇಲ್ಲಿ ಹೇಳಬೇಕು. ಕೇಂದ್ರೀಯ ಶಾಲಾ(C.E.R.T) ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಜೊತೆ ರಾಜ್ಯದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ತೌಲನಿಕವಾಗಿ ಅಧ್ಯಯನ ಮಾಡಿ ಸಲಹೆಗಳನ್ನು ನೀಡಲು ವಿಜ್ಞಾನ, ಗಣಿತ ಮತ್ತು ಸಮಾಜವಿಜ್ಞಾನಕ್ಕೆ ಸಂಬಂಧಿಸಿದಂತೆ ತಜ್ಞರ ಮೂರು ಸಮಿತಿಗಳನ್ನು ರಚಿಸಲಾಯಿತು. ಈ ಸಮಿತಿಗಳು ನೀಡಿದ ತೌಲನಿಕ ವಿಶ್ಲೇಷಣೆ ಮತ್ತು ಸಲಹೆಗಳನ್ನು ಆಧರಿಸಿ ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಗುಣಮಟ್ಟವನ್ನು ಹೆಚ್ಚಿಸಲಾಗಿದೆ. ಕೇಂದ್ರೀಯ ಶಾಲಾ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳಿಗಿಂತ ನಮ್ಮ ರಾಜ್ಯದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಗುಣಮಟ್ಟ ಕಡಿಮೆಯಾಗದಂತೆ ಕಾಯ್ದುಕೊಳ್ಳಲಾಗಿದೆ. ಜೊತೆಗೆ ಆಂಧ್ರ, ತಮಿಳುನಾಡು, ಮಹಾರಾಷ್ಟ್ರಗಳ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಜೊತೆ ನಮ್ಮ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಪರಿಶೀಲಿಸಲಾಗಿದೆ.

ಇನ್ನೊಂದು ಸ್ಪಷ್ಟನೆಯನ್ನು ನೀಡಲು ಬಯಸುತ್ತೇನೆ. ನಮ್ಮ ಸಮಿತಿಗಳು ಮಾಡಿರುವುದು ಪರಿಷ್ಕರಣೆಯೇ ಹೊರತು ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಸಮಗ್ರ ರಚನೆಯಲ್ಲ. ಆದ್ದರಿಂದ ಈಗಾಗಲೇ ರಚಿತವಾಗಿರುವ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಸ್ವರೂಪಕ್ಕೆ ಎಲ್ಲಿಯೂ ಧಕ್ಕೆಯುಂಟುಮಾಡಿಲ್ಲ. ಲಿಂಗತ್ವ ಸಮಾನತೆ, ಪ್ರಾದೇಶಿಕ ಪ್ರಾತಿನಿಧ ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಸಮಗ್ರತೆ, ಸಮಾನತೆ, ಸಾಮಾಜಿಕ ಸಾಮರಸ್ಯಗಳ ಹಿನ್ನೆಲೆಯಲ್ಲಿ ಕೆಲವು ಪರಿಷ್ಕರಣೆಗಳು ನಡೆದಿವೆ. ಹೀಗೆ ಪರಿಷ್ಕರಿಸುವಾಗ ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಪಠ್ಯಕ್ರಮ ಚೌಕಟ್ಟು ಮತ್ತು ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯಕ್ರಮ ಚೌಕಟ್ಟುಗಳನ್ನು ಮೀರಿಲ್ಲವೆಂದು ತಿಳಿಸಬಯಸುತ್ತೇನೆ: ಜೊತೆಗೆ ನಮ್ಮ ಸಂವಿಧಾನದ ಆಶಯಗಳನ್ನು ಅನುಸರಿಸಲಾಗಿದೆ. ಸಮಿತಿಗಳು ಮಾಡಿದ ಪರಿಷ್ಕರಣೆಯನ್ನು ಮತ್ತೊಮ್ಮೆ ಪರಿಶೀಲಿಸಲು ವಿಷಯವಾರು ಉನ್ನತ ಪರಿಶೀಲನ ಸಮಿತಿಗಳನ್ನು ರಚಿಸಿ ಅಭಿಪ್ರಾಯಪಡೆದು ಅಳವಡಿಸಲಾಗಿದೆ.

ಹೀಗೆ ಕ್ರಮಬದ್ಧವಾಗಿ ನಡೆದ ಕೆಲಸಕ್ಕೆ ತಮ್ಮನ್ನು ತಾವು ಸಂಪೂರ್ಣ ತೊಡಗಿಸಿಕೊಂಡ 27 ಸಮಿತಿಗಳ ಅಧ್ಯಕ್ಷರು ಮತ್ತು ಸದಸ್ಯರನ್ನು ಹಾಗೂ ಉನ್ನತ ಪರಿಶೀಲನಾ ಸಮಿತಿಯ ಸಮಸ್ತರನ್ನು ಕೃತಜ್ಞತೆಯಿಂದ ನೆನೆಯುತ್ತೇವೆ. ಅಂತೆಯೇ ಸಮಿತಿಗಳ ಕೆಲಸ ಸುಗಮವಾಗಿ ನಡೆಯುವಂತೆ ವ್ಯವಸ್ಥೆಮಾಡಿದ ಕಾರ್ಯಕ್ರಮ ಅಧಿಕಾರಿಗಳಾಗಿ ನಿಷ್ಠೆಯಿಂದ ದುಡಿದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘದ ಎಲ್ಲಾ ಅಧಿಕಾರಿಗಳನ್ನೂ ನೆನೆಯುತ್ತೇವೆ. ಸಹಕರಿಸಿದ ಸಿಬ್ಬಂದಿಗೂ ನಮ್ಮ ವಂದನೆಗಳು. ಅಭಿಪ್ರಾಯ ನೀಡಿ ಸಹಕರಿಸಿದ ಸರ್ವ ಸಂಘಟನೆಗಳು ಮತ್ತು ತಜ್ಞರಿಗೆ ಧನ್ಯವಾದಗಳು.

NOT TO BE REPUBLISHED

ಎಂ. ಪಿ. ಮಾದೇಗೌಡ
ವ್ಯವಸ್ಥಾಪಕ ನಿರ್ದೇಶಕರು
ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ (ರಿ.)
ಬೆಂಗಳೂರು

ಪ್ರೊ. ಬರಗೂರು ರಾಮಚಂದ್ರಪ್ಪ
ಸರ್ವಾಧ್ಯಕ್ಷರು
ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ (ರಿ.)
ಬೆಂಗಳೂರು

ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿಗಳ ವಿವರ

ಸರ್ವಾಧ್ಯಕ್ಷರು

ಪ್ರೊ. ಬರಗೂರು ರಾಮಚಂದ್ರಪ್ಪ : ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿ, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬೆಂಗಳೂರು.

ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿ

ಅಧ್ಯಕ್ಷರು

ಶ್ರೀಮತಿ ಎಸ್.ವಿ. ದೇಶಪಾಂಡೆ : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಆರ್.ಪಿ.ಡಿ ಕಾಲೇಜ್, ಬೆಳಗಾಂ.

ಸದಸ್ಯರು

ಶ್ರೀಮತಿ ಕಿಶೋರಿ ಡಿ. ಜೋಷಿ : ನಿವೃತ್ತ ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಮರಾಠಿ ವಿಭಾಗ, GI ಬಾಗೇವಾಡಿ ಕಾಲೇಜು, ನಿಪ್ಪಾಣಿ.

ಪ್ರೊ.ಎಸ್.ಎಸ್. ಚೌಹಾನ್ : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು ಮರಾಠಿ ವಿಭಾಗ, ಮರಾಠಿ ಮಂಡಲ ಕಾಲೇಜು, ಬೆಳಗಾಂ

ಶ್ರೀಮತಿ. ಅಲಕಾ ಮುತ್ಕೇಕರ್ : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಮರಾಠ ಮಂಡಳ ಕಾಲೇಜು.

ಡಾ.ಎಸ್.ಎಂ ರಾಯಮಾನೆ : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಕೆ.ಎಲ್.ಇ, ಬಿ.ಕೆ ಕಾಲೇಜು, ಚಿಕ್ಕೋಡಿ.

ಶ್ರೀ.ಪ್ರಕಾಶ್ ಬಿ.ನಾಗರ್ಲೆ : ನಿವೃತ್ತ ಶಿಕ್ಷಕರು, ಮುನಿಸಿಪಲ್ ಪ್ರೌಢಶಾಲೆ, ನಿಪ್ಪಾಣಿ, ಚಿಕ್ಕೋಡಿ ತಾ. ಬೆಳಗಾಂ ಜಿಲ್ಲೆ.

ಉನ್ನತ ಪರಿಶೀಲನ ಸಮಿತಿ

ಶ್ರೀ ಸರಜು ಕಾಟ್ಕರ್ : ಮಹಾಂತೇಶ್ ನಗರ, ಬೆಳಗಾವಿ.

ಶ್ರೀ ರಾಮಕೃಷ್ಣ ಮಾರುತಿ ಮರಾಠೆ : ಶ್ರೀಕಲ್ಪ , ಶಾಂತಿ ನಿಕೇತನ, ಟೀಚರ್ಸ್ ಕಾಲೋನಿ, ಬೆಳಗಾವಿ.

ಡಾ. ಗೋಪಾಲ್.ಎಸ್.ಮಹಾಮುನಿ ಅಲಿಯಾಸ್ ಸುತಾರ್ : ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಶಾಂತಿನಗರ, ಚಿಕ್ಕೋಡಿ ತಾ.ಬೆಳಗಾವಿ ಜಿಲ್ಲೆ.

ಸಲಹೆ ಮತ್ತು ಮಾರ್ಗದರ್ಶನ:

ಶ್ರೀ ಎಂ. ಪಿ. ಮಾದೇಗೌಡ, ವ್ಯವಸ್ಥಾಪಕ ನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬೆಂಗಳೂರು.

ಶ್ರೀಮತಿ ಎಂ. ಡಿ. ಉಷಾ, ಉಪನಿರ್ದೇಶಕರು ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ (ರಿ), ಬೆಂಗಳೂರು.

ಕಾರ್ಯಕ್ರಮ ಸಂಯೋಜಕರು :

ಎಲ್. ಶಂಕರೇಗೌಡ, ಸಹಾಯಕ ನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ (ರಿ), ಬೆಂಗಳೂರು.

KTBS NOT TO BE REPUBLISHED

अनुक्रमणिका

प्रथम सत्र

क्र.सं.	पाठाचे / कवितेचे नाव	लेखक / लेखिका / कवी	पृष्ठ क्र.
1.	सर्वात्मका शिवसुंदरा (कविता)	कुसुमाग्रज	1
2.	अभ्यास एक छंद	पु.ल.देशपांडे	5
3.	माझी आई	डॉ. रघुनाथ माशेलकर	13
4.	जिंकू आम्ही लढाई (कविता)	मनोहर आंधळे	22
5.	आमचा राष्ट्रीय खेळ–हॉकी	संकलन	25
6.	डॉ. चंद्रशेखर व्यंकटरामन	संकलन	32
7.	आठवणींचे गाव (कविता)	सदानंद सिनगारे	37
8.	परोपकाराचे फळ	मूळ कन्नड लेखक : बेटगेरी कृष्णमूर्ती मराठी अनुवाद : मीना वांगीकर	42
9.	आम्ही टिकलो तर तुम्ही टिकाल	नाट्यप्रवेश	50
10.	वाच पुस्तके (कविता)	अविनाश ओगले	56
11.	गोड गाणी (पूरक अभ्यास)		58
12.	शब्द खेळ		62

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

1. सर्वात्मका शिवसुंदरा

B1L5R6

कुसुमाग्रज (1912-1999): सन 1988 साली मराठी भाषेला 'ज्ञानपीठ पारितोषिक' मिळवून देणारे पहिले कवी. त्यांचे पूर्ण न ाव विष्णु वामन शिरवाडकर, विशाखा, किनारा, मराठी माती, जीवनलहरी असे एकूण 12 काव्यसंग्रह. 'समिधा' हे गद्यकाव्य, नटसम्राट, दुसरा पेशवा, वीज म्हणाली धरतीला अशी रुपांतरित नाटके, 'ययाती आणि देवयानी' प्रसिद्ध नाटक तसेच वैष्णव, जान्हवी इत्यादी प्रसिद्ध कादंबऱ्या.



सर्वात्मका शिवसुंदरा
स्वीकार या अभिवादना।
तिमिरातुनी तेजाकडे
प्रभु आमुच्या ने जीवना।।धृ ।।

सुमनात तू गगनात तू
ताऱ्यांमध्ये फुलतोस तू।
सद्धर्म जे जगतांमधे
सर्वांत त्या वसतोस तू ।।
चोहीकडे रुपे तुझी
जाणीव ही माझ्या मना ।।1।।

श्रमतोस तू शेतांमधे
तू राबसी श्रमिकांसवे।।
जे रंजले वा गांजले
पुसतोस त्यांची आसवे।
स्वार्थाविना सेवा जिथे
तेथे तुझे पद पावना।। 2 ।।

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

न्यायार्थ जे लढती रणी
तलवार तू त्यांच्या करी
ध्येयार्थ जे तमि चालती
तू दीप त्यांच्या अंतरी॥
ज्ञानार्थ जे तपती मुनी
होतोस त्यांची साधना ॥3 ॥



करुणाकरा करुणा तुझी
असता मला भय कोठले॥
मार्गावरी पुढती सदा
पाहीन मी तव पावले
सुजनत्व या हृदयामधे
नित जागवी भीतीविना॥ 4 ॥

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

नवीन शब्दार्थ

अभिवादन	-	नमन, नमस्कार
श्रमिक	-	श्रम करणारे, कष्ट करणारे
कर	-	हात
रंजले गांजलेले	-	गोरगरीब, दीनदुबळे
दीप	-	दिवा
साधना	-	प्रयत्न
तिमिर	-	अंधार
सुमन	-	फूल, पुष्प
सर्वात्मक	-	सर्व व्यापी, सर्व आत्म्यांत सामावलेला
करुणा	-	दया

स्वाध्याय

अ. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिही.

1. कविने प्रभूला कोणती विनंती केली आहे?
2. ईश्वर कोठे कोठे आहे असे कवीला वाटते?
3. ईश्वर कोणाची आसवे पुसतो?
4. न्यायासाठी लढणाऱ्यांना ईश्वर काय देतो?
5. माणसाला केव्हा भय वाटत नाही?
6. ईश्वर कोणासमवेत व कोठे श्रमतो?

आ. तीन-चार वाक्यांत उत्तरे लिही.

1. ईश्वराला सर्वात्मक असे का म्हटले आहे?

इ. खालील शब्दाप्रमाणे शब्द तयार कर.

नमुना : ध्येय - ध्येयार्थ, ध्येयासाठी

1. न्याय -
2. ज्ञान -
3. ध्यास -
4. राष्ट्र -
5. त्याग -
6. हित -

ई. खालील कवितेच्या ओळी पूर्ण कर.

1. जे रंजले .....
   .....
   .....
   ..... पद पावना
2. सुमनात तू .....
   .....
   .....
   .....वसतोस तू

उ. खालील कवितेच्या ओळींचा अर्थ तुझ्या शब्दात लिही.

न्यायार्थ जे लढती रणी
तलवार तू त्यांच्या करी
ध्येयार्थ जे तमि चालती
तू दीप त्यांच्या अंतरी॥

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

ऊ. खालील शब्दांना कवितेत आलेले समानार्थी शब्द लिही.

1. अंधार - 2. प्रकाश - 3. फूल -

4. आकाश - 5. अश्रू - 6. दिवा -

ए. शब्दातील अर्थाचे नमुन्याप्रमाणे फरक सांग.

नमूना : कर - हात

कर - काम करण्यास आज्ञा

1. पद - 2. सुमन - 3. अंतर -


पद - सुमन - अंतर -

ऐ. वाक्यात उपयोग कर.

1. अभिवादन 2. प्रार्थना 3. करुणा

❋ उपक्रम :

1. ही कविता शाळेमध्ये प्रार्थनेच्या वेळी दररोज म्हण.
2. अशा प्रकारच्या प्रार्थनांचा संग्रह कर.



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

✦✦✦✦

2. अभ्यास एक छंद

Z6K4C4



पु.ल. देशपांडे (1919-2000): मराठीतील नामवंत, सुप्रसिद्ध, प्रतिभाशाली चतुरस्त्र लेखक, काही काळ आकाशवाणीवर अधिकारी म्हणून त्यानी काम केले आहे. सन-1975 साली पु.लं.नी आकाशवाणीवरील शालेय कार्यक्रमात भाषण केले होते. त्याचाच संकलित भाग येथे दिला आहे.

सुंदर मी होणार, तुझे आहे तुजपाशी, ती फुलराणी इत्यादी नाटके' गणगोत, 'व्यक्ती आणि वल्ली', गुण गाईन आवडी यासारखी व्यक्तिचित्रे, अपूर्वाई, पूर्वरंग, जावे त्यांच्या देशा इत्यादी प्रवास वर्णने; बटाटयाची चाळ, वाऱ्यावरची वरात, 'असा मी असा मी' यासारखे एकपात्री प्रयोग केवळ अपूर्व असे म्हणावं लागेल.

(विनोदी लेखक म्हणून परिचित असलेले पु.ल. देशपांडे. अभ्यास म्हणजे कंटाळा, एक रुक्ष विषय असूनसुध्दा तो सोपा करुन त्याची आवड कशी निर्माण करावी याचे मार्मिक चित्रण या पाठात करीत आहेत. 'अभ्यास एक छंद' कसा करावा हे त्यांच्याच शब्दात वाचा.)

माझ्या विद्यार्थी मित्रांनो, मला तुमच्याशी बोलायची संधी मिळते आहे, त्याचा खूप आनंद झाला. तुम्ही एखाद्या थोर लेखकाचा धडा म्हणून जेव्हा वाचता तेव्हा तुमच्या लक्षात हे आलंय का, की आपण एका थोर माणसाच्या सहवासात आहोत? हे तुमच्या लक्षात केव्हा येईल ठाऊक आहे ? तुम्ही ज्यावेळी पुस्तक हे थोरांना भेटण्याची संधी आहे या दृष्टीने ते हाती घ्याल तेव्हा!

परीक्षेला पुस्तक नेमलंय म्हणून वाचलं पाहिजे अशा भावनेन जर तुम्ही पुस्तक हातात धरलत तर त्या लेखकाशी तुमचा संवादच सुरु होणार नाही. कादंबरी असो किंवा अगदी रुक्ष वाटणारं भूगोलाचं पुस्तक असो, कुणी तरी आपल्याशी केलेली ही कानगोष्ट आहे, कुणी आपल्याला आवडलेली माहिती खूप हौसेनं देतो आहे अशा भावनेनं जर आपण ते हाती धरलं नाही तर तुमचा संवादच सुरु होणार नाही.

नव्या सत्राच्या आरंभी तुम्हाला सांगायची मुख्य गोष्ट ही, की गणिताच्या काय, भूगोलाच्या काय किंवा भाषा विषयाच्या काय, कुठल्याही पुस्तकाच्या सहवासात तुम्ही असताना एखाद्या मित्राच्या सहवासात आणि ते देखील आपल्यापेक्षा ज्यानं खूप निरनिराळ्या

NOT TO BE REPUBLISHED @KTES

गोष्टींचा अनुभव घेतलाय अशा मित्राच्या सहवासात, आता दोन-चार तास काढणार आहोत असं समजावं म्हणजे जे पुस्तक उगीचच तुम्हाला परीक्षेची भीती घालत येतं, ते तुमच्या मित्रासारख तुम्हाला वाटेल.



पोहता न येणाऱ्या मुलांना पाण्याची भीती वाटते. पण एकदा पाण्याशी मैत्री केली तर ते पाणी आपण त्याच्यावर कसंही हातपाय मारले असताना हवा तितका वेळ उचलून धरतं हे कळलं, की सुट्टी लागल्याबरोबर आपण तलावाकडे किंवा नदीकडे एखाद्या मित्राच्या घरी जावं तशी धूम ठोकतो की नाही ? सुरुवातीला जातं थोडं नाकातोंडात पाणी. पुस्तकांचं तसंच आहे.

पुष्कळदा आपल्याला वाटतं की अमुक एक विषय आपल्याला आवडत नाही. समजा तुम्हाला वाटलं इंग्लिश आपल्याला आवडत नाही. फार अवघड आहे. मग तोच विषय पकडा. त्याच्यां मागं लागा. त्या भाषेतील शब्दांशी मैत्री जमवा. पोष्टाची तिकीटे जमविता ना ! तसा एक-एक शब्द गोळा करत गेलात, की पहा तुमची इंग्रजीशी दोस्ती जमते की नाही ते ! तुम्ही एखाद्याशी दोस्ती जमवता म्हणजे काय? त्याच्या फक्त नाकाशीच दोस्ती जमवता किंवा हाताशीच जमवता? तुमचा दोस्त तुमच्या घरी न येता त्यान नुसत्या चपला पाठविल्या तर चालेल तुम्हाला? नाही चालणार. तो संपूर्णपणाने तुमच्या घरी यायला हवा. तसंच विषयांचं आहे. तुमच्या पुस्तकाशी तुमचा संपूर्ण परिचय हवा. तुम्हाला नेमलेलं नवीन पुस्तक हाती आलं की खरं तर कळो, न कळो, ते अधाशासारख वाचून काढलं पाहिजे. एखाद्या कवीची पाठ्यपुस्तकातील कविता तुम्हाला आवडली तर त्या कवीच्या आणखी कविता तुम्ही

© SCERT NOT TO BE REPUBLISHED

वाचायला हव्यात. आईने बशीत एकच करंजी दिली की बाकीच्या करंज्या कुठल्या डब्यात आहेत, हे हळूच पाहून ठेवता ना तुम्ही? मग एक कविता आवडली की बाकीच्या कविता कुठल्या पुस्तकात असतील हे शोधून काढायला काय हरकत आहे? तुमच्यापैकी कितीतरी मुलांना पोष्टाची तिकीट गोळा करायचा, काडयांच्या पेटयांवरची चित्र गोळा करायचा छंद असतो. अभ्यास हा सुध्दा छंद झाला पाहिजे. तरच शिकणं हा आनंदाचा भाग होऊन जाईल. अभ्यास करणं हे कोडी सोडवण्यासारखंच आहे. कोडं सुटत नाही तोपर्यंत कठीण ! ते सुटणार नाही म्हणून हातपाय गाळून बसणं हे तर भ्याडपणाचं लक्षण आहे.

एखाद्याशी मैत्री जमवण्याचा उत्तम उपाय म्हणजे आपण आपल्या मैत्रीचा हात त्याच्या पुढं करणं ही तुमच्या कानात सांगण्यासारखी हीच कानगोष्ट आहे. खेळापासून ते गणितापर्यंत सगळ्यांशी मैत्री करा. हा आनंदाचा सोहळा होईल. या सोहळ्यात खूप यशस्वी व्हा ही तुम्हा सर्वांना शुभेच्छा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

नवीन शब्दार्थ

संवाद साधणे	-	चर्चा करणे, बोलणे
रुक्ष	-	कंटाळवाणा
कानगोष्ट	-	गुपित सांगणे
धूम ठोकणे	-	पळत सुटणे
परिचय	-	ओळख
छंद	-	आवडीने केलेली कृती
अधाशासारखे	-	खादाडासारखे
हातपाय गाळणे	-	खूप घाबरणे
भ्याडपणा	-	भित्रेपणा
हात पुढे करणे	-	मदत करणे, मैत्रीसाठी पुढाकार घेणे

स्वाध्याय

अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

1. पुस्तकातील पाठांशी आपला संवाद केव्हा सुरु होईल ?
2. पुस्तक मित्रासारखे केव्हा वाटते ?
3. अभ्यासाच्या सरावाची लेखकाने कशाशी तुलना केली आहे ?
4. इंग्रजी विषयाशी दोस्ती केव्हा जमेल ?
5. अभ्यासाला 'एक छंद' असे का म्हटले आहे ?
6. परीक्षा हा आनंदसोहळा केव्हा होईल ?

आ. वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग कर.

1. कानगोष्टी करणे, 2. हातपाय गळणे 3. हात पुढे करणे.

इ. नमुन्याप्रमाणे लिही.

नमुना : कवी - कविता

नाटककार - .....

चित्रकार - .....

शिल्पकार - .....

कादंबरीकार - .....

नकलाकार - .....

ई. फरक लिही.

कोडी - कोंडी तोड - तोंड

चिता - चिंता नदी - नंदी

उ. पाठाच्या आधारे वाक्ये पूर्ण कर.

1. परीक्षेला पुस्तक नेमलंय म्हणून वाचलं तर .....
2. पुस्तकाशी मैत्री केली तर .....
3. एखाद्याशी मैत्री जमविण्याचा उत्तम उपाय .....
4. इंग्रजीशी दोस्ती जमविण्याकरिता .....

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

ऊ. कंसातील योग्य विशेषणे वापरुन मोकळ्या जागा भर.

(पांढऱ्याशुभ्र, निळ्याभोर, हिरवीगार, काळेकुट्ट, पिवळीजर्द)

1. पिंपळाची ..... पाने सळसळत होती.
2. बागेत शेवंतीची ..... फुले फुलली आहेत.
3. दारात जाईजुईच्या ..... फुलांचा सडा पडला होता.
4. ..... तलावात कमळे फुलली होती.
5. आकाशात ..... ढग जमले होते.

ए. ''माझा आवडता छंद'' या विषयावर 10 वाक्ये लिही.

ऐ. विरुद्ध अर्थी शब्द लिही.

थोर × ..... सुसंवाद × .....

आरंभ × ..... आनंद × .....

आवड × .....

ओ. लिंग बदल करुन शब्द लिही.

कवी - लेखक - वक्ता -

❇ उपक्रम :

शरीराच्या अवयवांवरुन उदा : हात, पाय, कान, डोळे, नाक इत्यादीवरुन आलेले वाक्प्रचार मिळवून संग्रहित कर आणि प्रकल्पवहीत लिहून काढ.

हे ही करुन पहा -

खालील शब्द प्रत्येकी पाच वेळा जसेच्या तसे लिही

1. ज्योत्स्ना 2. परीक्षा 3. अल्पसंख्याक
4. उद्‌ध्वस्त 5. वाङ्‌मय

@KTRS NOT TO BE REPUBLISHED

भाषाभ्यास

आपण मागील इयत्तेत नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद या शब्दांच्या चार जातींची सविस्तर माहिती मिळविली. वरील चारही जातीतील शब्दांचा लिंग, वचन, काळ यानुरुप शब्दांच्या रुपात बदल होतो म्हणून त्यांना विकारी शब्द म्हणतात.

आता आपण कर्ता, कर्म, क्रियापद यांचे लिंग, वचन, पुरुष बदलले तरी ज्या शब्दांची रुपे जशीच्या तशीच रहातात अशा अविकारी शब्दांचा अभ्यास करु.

अविकारी शब्दांना अव्यय असे म्हणतात.

अव्ययांचे चार प्रकार आहेत.

1. क्रियाविशेषण अव्यय
2. शब्दयोगी अव्यय
3. उभयान्वयी अव्यय
4. केवलप्रयोगी अव्यय

क्रियाविशेषण अव्यय

खालील वाक्ये वाच

1. आजोबा नेहमी फिरायला जातात.
2. सर्व लोकांनी मागे बसावे.
3. सुमन हळूहळू चालते.
4. आई अचानक थांबली.
5. आम्ही आज नवीन पुस्तके आणणार.
6. दादा कोणतेही गणित सहज सोडवितो.
7. तू विजापुरला केव्हा जाणार ?
8. येथे लोकांची गर्दी का आहे ?

या वाक्यांतील नेहमी, मागे, हळूहळू, अचानक, आज, सहज, केव्हा, का हे शब्द क्रियापदाबद्दल अधिक माहिती देतात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

क्रियापदाबद्दल विशेष माहिती देणाऱ्या अविकारी शब्दांस 'क्रियाविशेषण अव्यय' असे म्हणतात. वाक्यातील क्रियापदाला कसा, केव्हा, कोठे, कशी हे प्रश्न विचारले असता जी उत्तरे येतात ती क्रियाविशेषण अव्यये असतात.

क्रियाविशेषण अव्ययांचे प्रकार -

1. कालवाचक क्रियाविशेषण -

   क्रिया केव्हा घडली किंवा घडत आहे किंवा घडणार हे दर्शवितात त्यांना कालवाचक क्रियाविशेषण म्हणतात.

   उदाहरणार्थ : आज, उद्या, वारंवार, अचानक, दरवर्षी, नेहमी, रातोरात, आत्ता, मग, यंदा, पूर्वी, सध्या इत्यादी

2. स्थलवाचक क्रियाविशेषण - क्रिया कोठे व कोठून घडली ते स्थल दर्शवितात त्याला स्थलवाचक क्रियाविशेषण म्हणतात.

   उदाहरणार्थ - येथे, तेथे, सभोवार, चोहीकडे, मध्ये, खाली, वर, इकडे, तिकडे, समोरुन, दूर, आस-पास इत्यादी.

3. परिमाण वाचक (संख्यावाचक) क्रियाविशेषण अव्यय - क्रिया किती वेळा घडली किंवा क्रियेचा परिमाण दर्शवितात त्याला संख्यावाचक क्रियाविशेषण म्हणतात.

   उदाहरणार्थ - किंचित, जरा, अत्यंत, बिलकुल, मुळीच, अती, पुष्कळ, थोडे, फार, एकदा, दहादा, खूप इत्यादी

4. रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यय - क्रियेची रीत किंवा प्रकार दर्शविणाऱ्या अव्ययांना रीतिवाचक क्रियाविशेषणे म्हणतात.

   उदाहरणार्थ - सावकाश, जपून, हळू, जलद, आपोआप, सहज, फुकट, पटकन, कदाचित, केवळ इत्यादी.

5. प्रश्नार्थक क्रियाविशेषण अव्यय - वाक्यातील विधानांना प्रश्नाचे स्वरुप देण्यासाठी वापरलेल्या शब्दांना प्रश्नार्थक क्रियाविशेषणे म्हणतात.

   उदाहरणार्थ - का, ना

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

स्वाध्याय

- या पाठातील क्रियाविशेषण अव्ययांची यादी कर.
- क्रियाविशेषण व क्रियाविशेषण अव्यय यातील फरक.

खालील वाक्ये वाच -

1. तो मुलगा चांगला नाचतो.
2. ती मुलगी चांगली नाचते.
3. त्या मुली चांगल्या नाचतात.

वरील वाक्यात नाचतो, नाचते, नाचतात हे क्रियापद आहे. त्या क्रियापदाचे विशेषण चांगला, चांगली, चांगल्या हे आहे. वाक्यातील कर्त्याचे लिंग, वचन व पुरुष याला अनुसरुन क्रियापदाच्या विशेषणाचे स्वरुप बदलले आहे या वाक्यात चांगला हा विकारी शब्द आहे.

1. तो मुलगा हळूहळू चालतो.
2. ती मुलगी हळूहळू चालते.
3. त्या मुली हळूहळू चालतात.

वरील वाक्यात चालतो, चालते, चालतात हे क्रियापद आहे. त्या क्रियापदाचे विशेषण हळूहळू हे आहे. वाक्यातील कर्त्याच्या लिंग, वचन व पुरुष याला अनुसरुन क्रियापदाच्या विशेषणाचे स्वरुप बदलले नाही. या वाक्यात हळूहळू हा अविकारी शब्द आहे.

* वाक्यातील कर्त्याचे लिंग, वचन व पुरुष याला अनुसरुन क्रियापदाच्या विशेषणाचे स्वरुप बदलत असेल तर त्याला 'क्रियाविशेषण' म्हणतात.
* वाक्यातील कर्त्याचे लिंग, वचन व पुरुष याला अनुसरुन क्रियापदाच्या विशेषणाचे स्वरुप बदलत नसेल तर त्याला 'क्रियाविशेषण अव्यय' म्हणतात.



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

3. माझी आई

M3F6F2

डॉ. रघुनाथ माशेलकर



विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात देशाला जागतिक स्तरावर परमोच्च आघाडी मिळवून देण्याच्या ध्यासाने झपाटलेले डॉ. रघुनाथ माशेलकर एक फार मोठे वैज्ञानिक आहेत. त्यांनी आतापर्यंत स्वकर्तृत्वाने स्वतःसह देशाचे, पर्यायाने माशेलचे व गोमंत भूमीचे नाव विश्वात प्रसिद्ध केले. त्यांना घडविण्यात आईचा मोठा वाटा आहे असे डॉ. माशेलकराना वाटते. आईने त्यांना घडविले. तिने स्वतः काबाडकष्ट केले, पण माशेलकरांना शिकविले. त्यांच्या बालपणीच्या आठवणी त्यांच्याच शब्दात वाचा 'माझी आई' या प्रस्तुत पाठात.

(जगातल्या प्रत्येक यशस्वी आणि महान पुरुषांच्या यशामध्ये स्त्रीचे पाठबळ आणि प्रेरणा यांच महत्व अनन्यसाधारण आहे. कोणाच्या यशामध्ये पत्नीच्या रुपातील पाठबळ महत्वाचं, तर कोणाच्या यशामध्ये बहिणीच्या रुपातील पाठबळ महत्वाचं. तसेच जगामध्ये 'आदर्श राजा' म्हणून जगप्रसिद्धी मिळवलेले शिवाजी महाराज, किंवा जगाला भारतीय तत्वज्ञानाचं तेजोमय दर्शन घडवणारे स्वामी विवेकानंद, नाही तर आईचे महन्मंगल स्तोत्र लिहिणारे साने गुरुजी, या सर्वांच्या यशामध्ये आईचे पाठबळ आणि प्रेरणा महत्वाची ठरली आहे.

अशाच प्रकारे आईच्या प्रेरणेने घडलेले जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक डॉ. रघुनाथ माशेलकर हे एक आहेत. आपल्या आईने दिलेल्या प्रेरणेचे आणि तिच्या दिव्य त्यागाचे वर्णन डॉ. माशेलकरांनी आपल्या शब्दात खालीलप्रमाणे व्यक्त केले आहे. यांचे शब्दांकन श्री. सागर देशपांडे यांनी केले आहे. ते वाचा.)

'माझी आई माझं प्रेरणास्थान आहे, तिने मला जीवनमूल्यं शिकवली' असं मी नेहमी सांगतो. कारण तिच्यामुळंच मी घडलो, संस्कारित झालो आणि आयुष्यातील अनेक आव्हानांना सामोरे जात-जात इथंवर येऊन पोहचलो.

दक्षिण गोव्यातलं माशेल हे आमचं मूळ गाव. येथे माझा जन्म 1 जानेवारी 1943 रोजी झाला आहे. माझ्या वयाच्या सहाव्या वर्षी माझे वडील अनंत माशेलकर यांचे निधन झाले. आई आणि मी एकमेकांच्या सोबतीला उरलो. मला त्यावेळचं फारसं आठवत नाही; पण

© SCERT NOT TO BE REPUBLISHED

वडिलांच्या निधनानंतर आई आणि मी मुंबईत आलो. त्यानंतर आम्हा मायलेकरांच्या आयुष्यात एका नव्या अध्यायाला सुरुवात झाली. माझ्या आईचं नाव अंजलीबाई. प्रचंड सोशिक, धीराची अन् जिद्दीचीही. गिरगावातील खेतवाडीमध्ये एका छोट्याशा चाळीत आम्ही राहू लागलो. उदरनिर्वाहासाठी आई कष्टाची अनेक कामं करायची. तिचं शिक्षण जेमतेम लिहिण्यावाचण्यापुरतंच झालं होतं. त्यामुळे तिला नोकरी मिळत नव्हती. शिवणकाम मिळणार म्हणून ती एकदा काँग्रेस हाऊसजवळ गेली. मोठी रांग होती तिथं. संध्याकाळी तिचा नंबर लागला. पण 'किमान तिसरी झालेल्यांनाच घेतलं जाईल' असं सांगण्यात आलं. त्यामुळं तिला नाईलाजाने परत फिरावं लागलं; पण त्याचवेळी तिनं आपल्या मनाशी निश्चय केला, मी माझ्या मुलाला खूप खूप शिकवीन, कारण शिक्षणाशिवाय या जगात मान नाही!



मला आठवतंय.... गिरगावातून लोअर परळपर्यंत डोक्यावर कापडाचे तागे घेऊन ती चालत जात असे. दोनशे वार कापड ती डोक्यावरुन वाहून न्यायची; कारण पाटीवाल्याला द्यायला सहा आणेही तिच्याकडे नसत. म्युनिसिपालटीच्या शाळेत मी जाऊ लागलो; पण त्या वेळी शाळेतल्या चाचणी परीक्षेसाठी लागणारा तीन पैशांचा कागद आणणंही आम्हांला अशक्य व्हायचं. आमची शाळाही गरीब होती. माझ्या आईच्या डोळ्यात त्या वेळी पाणी यायचं, तरी तिनं धीर सोडला नाही.

NOT TO BE REPUBLISHED



लहानपणापासून मी अभ्यासात हुशार होतो, पण समोर प्रतिकूल परिस्थितीचं आव्हान ! वयाच्या 12 व्या वर्षापर्यंत मला अनवाणी चालावं लागलं. तरीदेखील मोठया निर्धारानं प्रयत्नपूर्वक माझा अभ्यास मी सुरु ठेवला. अभ्यासातली एखादी शंका आली, काही अडलं तर विचारणार कुणाला? माझा एक मामा दोन वर्षं मुंबईत होता, त्याची त्या वेळी मदत झाली, मार्गदर्शन मिळालं. पण सगळ्यांत महत्वाचं म्हणजे आमच्या शाळेत मला खूप चांगले शिक्षक लाभले. माझ्या आयुष्याच्या जडणघडणीमध्ये त्यांचा वाटा खूप मोलाचा आहे.

खेतवाडीतील मराठी शाळेमध्ये प्रवेश फीचे 21 रुपये भरायचे होते. त्या वेळी एवढी रक्कम कुठून आणणार? अखेर कुठून कुठून मागून, उसनवारी करुन माझ्या आईनं या पैशांची जुळवाजुळव केली. पुढं माझ्या पहिल्यावहिल्या विदेश प्रवासाच्या वेळी असंच झालं. इंग्लंडला जायचं होतं. तिकिटाचे पैसे नव्हते. आमच्या ओळखीच्या काही जणांनी मदत केली. हे सर्व पैसे नंतर आम्ही परतही केले.

चाळीतल्या आमच्या छोटयाशा जागेत अभ्यासाजोगं वातावरण कुठून येणार? मग गिरगाव चौपाटीवरील दिव्यांच्या प्रकाशात मी अभ्यास करायचो. रेल्वे स्टेशनवर शेवटच्या गाड्या गेल्या की तिथे प्लॅटफॉर्मवर जाऊन बसायचो. अभ्यासातली चिकाटी कायम होती; त्यामुळे मॅट्रिकच्या

© KTB NOT TO BE REPUBLISHED

परीक्षेत संपूर्ण राज्यात 30 वा आलो आणि बारावीच्या परीक्षेत बोर्डात 11 वा आलो. माझ्या आईला अशा वेळी खूप आनंद होत असे. मात्र पुढचं उच्च शिक्षण घेणं अशक्य आहे असं वाटत असतानाच, सर दोराबजी टाटा ट्रस्टची स्कॉलरशीप मिळाली आणि माझं शिक्षण पुढं चालू राहिलं.

मोलमजुरी करुन आपल्या मुलाला वाढवताना त्यानं काही वावगं वागू नये, यासाठी माझ्या आईचं माझ्यावर बारीक लक्ष असे. लहानपणी मी पत्ते, गोट्या खेळलेले तिला अजिबात आवडत नसे. एकदा तर तिनं गोट्या गटारात फेकायला लावल्या होत्या. पत्ते हातात दिसल्यावरही ती रागावल्याचं मला अजून आठवतंय. महाविद्यालयीन शिक्षणानंतर मुंबई विद्यापीठाच्या केमिकल टेक्नॉलॉजी विभागातून मी पुढचं शिक्षण घेतलं. रासायनिक अभियंता झालो. नोकरी शोधू लागलो. एवढया वर्षांच्या काबाडकष्टानंतर आपल्या आईला चार दिवस सुखाचे लाभावेत ही त्यामागची इच्छा होती. पण आईनं विचारलं, 'तुझ्या विषयातली पुढची पदवी कोणती? ती तू घे. मग अवघ्या तीन वर्षांत मी पी.एच.डी. झालो. आई म्हणायची, 'तू घरात नको लक्ष घालू, जेवढं शिकता येईल तेवढं शिकून घे, पोट हे भरतंच, त्यासाठी मी काम करीन. मी तुझ्या पाठीशी आहे. कष्टाचं फळ परमेश्वर आपल्याला देतोच.'

परदेशात मी गेलो तेव्हा दर आठ दिवसांनी मी व आई एकमेकांना न चुकता पत्र पाठवत असू. तिला इंग्रजी येत नव्हतं आणि म्हणून ती माझ्या मित्रांकडून पाकिटावर इंग्रजीतून पत्ता लिहून घेई. शेवटी तिला वाटलं की, आपणच शिकावं. तिने कॅपिटल इंग्रजी अक्षरात स्वतः पत्रावरील पत्ता लिहून मला पत्र पाठवलं होतं. माझ्या मुलींकडून फोन करायला ती शिकली. मी दौऱ्यावर असलो की नियमितपणे तिच्याशी फोनवर बोलायचो. घरात कोकणी बोलायची, पण पुढे ती एखादं इंग्रजी वाक्यही बोलून जायची. मला खूप आनंद वाटायचा. एक गोष्ट आवर्जून नोंदवलीच पाहिजे. माझी पत्नी वैशाली आणि माझी आई यांच्यातील संबंध हे अगदी आई आणि मुलीसारखेच होते. खूप जिव्हाळा होता दोघींमध्ये.

पुण्यात 2000 साली सायन्स काँग्रेसचं ऐतिहासिक आणि संस्मरणीय अधिवेशन झालं, त्या वेळी माझं अध्यक्षीय भाषण झालं. तत्कालीन पंतप्रधान अटलजींसह अनेक नोबेल पुरस्कारप्राप्त शास्त्रज्ञ आणि विविध क्षेत्रांतील दिग्गज व हजारो पुणेकर त्यावेळी उपस्थित होते, माझी आई टी.व्ही. वरुन हा सोहळा पहात होती. त्या वेळी तिला खूप समाधान वाटलं, आनंद वाटला, तिच्या सर्व कष्टांच सार्थक झालं, अशीच जणू तिची भावना होती! अलीकडेच काही वर्षांपूर्वी माझ्या आईचं वार्धक्यानं निधन झालं, पण अधूनमधून ती माझ्या स्वप्नात येते. आशीर्वाद देते. आता तिच्या नसण्याने निर्माण झालेली पोकळी जाणवतेच.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

पण तिच्या आशीर्वादामुळे आणि आठवणींमुळे तिचं अस्तित्व जाणवतं. तिची शिकवण आणि तिची मूर्ती नेहमी डोळ्यांसमोर येते.

नवीन शब्दार्थ

वार	-	तीन फूट लांब, यार्ड
पाटीवाले	-	डोकीवर टोपलीतून समानाची ने आण करणारे
प्रेरणा	-	प्रोत्साहन
तेजोमय	-	तेजस्वी
उसनवारी	-	परतीच्या बोलीवर घेतलेली वस्तू
जुळवणी	-	जोडणी
पाठबळ	-	मदत
आव्हान	-	कठिण परिस्थिती (टीप : पाठाच्या संदर्भानुसार होणारा अर्थ)
श्रमिक	-	श्रम करणारे, कष्ट करणारे

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

स्वाध्याय

अ. एका वाक्यात उत्तरे लिही.

1. डॉ. रघुनाथ माशेलकरांना कोणाकडून प्रेरणा मिळाली?
2. इ. स. 2000 सालचे विज्ञान अधिवेशन कोठे भरले?
3. डॉ. माशेलकरांच्या आईचे नाव काय होते?
4. डॉ. माशेलकरांचे मूळ गाव कोणते?
5. डॉ. माशेलकरांची कोणती इच्छा होती?
6. डॉ. माशेलकरांच्या आईला काय आवडत नसे?

आ. दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिही.

1. अंजलीबाईंनी मनाशी कोणता निश्चय केला?
2. महाविद्यालयीन शिक्षणानंतर माशेलकर नोकरी का शोधू लागले?
3. डॉ. माशेलकरांच्या आईंना का समाधान वाटले?
4. तुमच्या कोणकोणत्या गोष्टी वडीलधाऱ्यांना आवडतात?

इ. खालील वाकप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग कर.

1. सामोरे जाणे
2. डोळ्यात पाणी येणे
3. निश्चय करणे
4. सार्थक होणे

ई. योग्य जोड्या जुळव.

1. स्वामी विवेकानंद	अ. वैज्ञानिक
2. छ. शिवाजी महाराज	आ. क्रिकेटपटू
3. साने गुरुजी	इ. तत्वज्ञानी
4. डॉ. रघुनाथ माशेलकर	ई. आदर्श राजा.
5. सचीन तेंडुलकर	उ. श्यामची आई.


उ. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिही.

1. प्रतिकूल ×	2. कीर्ती × .....
3. यश ×	4. पास × .....
5. मृत्यू ×	6. परदेश × .....
7. व्यक्त ×	8. धीर × .....

ऊ. खालील वाक्य कोणी केव्हा व कोणास म्हटले आहे ते संदर्भासह लिही.

1. ''माझी आई माझे प्रेरणास्थान आहे.''
2. ''मी माझ्या मुलाला खूप खूप शिकवीन''
3. ''तुझ्या विषयातील पुढची पदवी कोणती?''
4. ''आपल्या कष्टाचे फळ परमेश्वर आपल्याला देतोच''.


ए. पाठाच्या आधारे खालील शब्दकोडे पूर्ण कर.



© BTBS NOT TO BE REPUBLISHED

1. लेखकाचे नाव (आडवा शब्द)
2. लेखक या देशाचा आहे. (उभा शब्द)
3. आयुष्यातील यांना सामोरे जात लेखक इथवर येऊन पोहोचले.(उभा शब्द)
4. मला टी.व्ही. वर पाहून आईला वाटले. (उभा शब्द)
5. लेखकाची सुरुवातीची परिस्थिती अशी होती. (उभा शब्द)
6. लेखक मोठे झाल्यावर या पदावर पोहोचले. (उभा शब्द)

ऐ. खालील शब्द-कोडे सोडव (चित्राखाली दिलेल्या सूचनांची मदत घे.)



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

1. स्वच्छ
2. मोठ्याच्या विरुद्ध
3. उद्देश
4. मसाल्याचा एक पदार्थ
5. लाज, शरम
6. रामाचा लहान भाऊ
7. शरीरावरील बारीक केस
8. कपाळ

ओ. खालील शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिही.

1. कोणतीही तक्रार न करणारा .....
2. सतत पैसे खर्च करणारा .....
3. देशाची सेवा करणारा .....
4. आपल्याच मनाप्रमाणे चालणारा .....

5. इतरांना मार्ग दाखविणारा .....
6. स्वतःशी केलेले भाषण .....
7. गावच्या पंचाचे राज्य .....
8. कधीही नाश न पावणारे .....
9. शरण आलेला .....
10. कार्य करण्याची पात्रता असणारा .....

❊उपक्रम :

1. 'माझी आई' याबद्दल पंधरा ओळी लिही.
2. 'श्यामची आई' हे साने गुरुजींचे पुस्तक मिळवून वाच.

हे ही करुन पहा -

खालील शब्द प्रत्येकी पाच वेळा जसेच्या तसे लिही -

1. कोट्यधीश
2. देदीप्यमान
3. ठराविक
4. पाश्चिमात्य
5. पाश्चात्य

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

भाषाभ्यास

शब्दयोगी अव्यय

खालील वाक्ये वाच -

1. राष्ट्रासाठी कार्य करा.
2. वर्गामध्ये दंगा घातला.
3. सूर्योदयापूर्वी उठावे.
4. माझ्या घराजवळ शाळा आहे.
5. आई बाळाला फुलासारखे जपते.
6. सूर्य ढगामागे लपला.
7. टेबलाखाली पुस्तक आहे.

8. घरावर पक्षी आहेत.

9. मुलापेक्षा मुलगी हुशार आहे.

10. माझ्याजवळ चार पेनं आहेत.

नाम अथवा सर्वनामाला जोडून येणाऱ्या व वाक्यातील इतर शब्दांशी संबंध स्पष्ट करणाऱ्या अव्ययांना 'शब्दयोगी अव्यय' असे म्हणतात.

नाम/सर्वनाम	+	शब्दयोगी अव्यय	=	शब्दाचे सामान्यरुप	संबंध
राष्ट्र	+	साठी	=	राष्ट्रासाठी	कार्य
वर्ग	+	मध्ये	=	वर्गामध्ये	दंगा
सूर्योदय	+	पूर्वी	=	सूर्योदयापूर्वी	उठणे
घर	+	जवळ	=	घराजवळ	शाळा
फूल	+	सारखे	=	फुलासारखे	बाळ
ढग	+	मध्ये	=	ढगामध्ये	सूर्य
टेबल	+	खाली	=	टेबलाखाली	पुस्तक
घर	+	वर	=	घरावर	पक्षी
मूल	+	पेक्षा	=	मुलापेक्षा	मुलगी
मी	+	जवळ	=	माझ्याजवळ	पेन

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

स्वाध्याय

खालील शब्दयोगी अव्ययांचा उपयोग करुन शब्द लिही.

1. पुढे
2. मागे
3. आत
4. मध्ये
5. आतून
6. वरुन
7. पेक्षा
8. सारखे
9. विना
10. सुध्दा



4. जिंकू आम्ही लढाई



तंत्र आणि विज्ञान युगातील
आम्ही बालके सारी,
ज्ञानाच्या पंखांनी आता
घेऊ उंच भरारी

राष्ट्राची सर्वोच्च धुरा ही
विज्ञानाच्या हाती
अभिमानाने गातो आम्ही
या देशाची महती.

विविध फुले अन् धर्मांनी
नटलेला भारत सारा,
पण सर्वांना मनापासुनी
एक तिरंगा प्यारा.

शिरीष हुतात्मा आदर्श अमुचा
आम्ही शूर शिपाई,
भारतभूच्या अखंडतेची
जिंकू आम्ही लढाई.

कवि : मनोहर आंधळे

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

नवीन शब्दार्थ

भरारी - झेप

महती - मोठेपण

प्यारा - प्रिय

धुरा - जबाबदारी

हुतात्मा - देशासाठी बलिदान केलेला

स्वाध्याय

अ. एका वाक्यात उत्तरे लिही.

1. बालकाला कोणत्या पंखांनी भरारी घ्यावीशी वाटते?
2. राष्ट्राची सर्वोच्च धुरा कोणाच्या हाती आहे?
3. आपला भारत देश कशाकशांनी नटलेला आहे?
4. आपल्या समोर कोणाचा आदर्श आहे?
5. आपल्याला कोणती लढाई जिंकली पाहिजे?
6. आपल्या सर्वांना मनापासून कोण प्रिय आहे?

आ. दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिही.

1. आपल्या देशात कोणकोणती विविधता आढळते?
2. आपण उंच भरारी का घेतली पाहिजे?

इ. विरुद्ध अर्थाचे शब्द लिही.

1. ज्ञान
2. धर्म
3. शूर
4. जिंकणे

ई. लयबद्ध शब्दांच्या जोड्या जुळव.

1. सारी	अ) लढाई
2. हाती	आ) प्यारा
3. सारा	इ) भरारी
4. शिपाई	ई) महती

© SCERT NOT TO BE REPUBLISHED

उ. अर्थ सांगून वाक्यात उपयोग कर.

1. धुरा वाहणे
2. महती गाणे
3. भरारी घेणे

ऊ. खालील शब्दसमूहास एक शब्द लिही.

नमूना : देशासाठी बलिदान केलेला - हुतात्मा

1. वाटेवरून चालणारा.....
2. तीन रंगानी नटलेला .....
3. ज्याच्यात खंड पडत नाही असा .....

ए. समानार्थी शब्द लिही.

1. पंख -
2. भरारी -
3. महती -
4. शिपाई -
5. लढाई -

❋ उपक्रम :

1. देशासाठी बलिदान केलेल्या वीरांची व नेत्यांची सचित्र माहिती मिळवून शिक्षकांच्या मदतीने हस्तलिखित तयार कर.
2. शिक्षकांच्या सहाय्याने देशभक्तिपर गीतांच्या स्पर्धेचे शाळेत आयोजन कर व त्यात भाग घे.
3. 'डोळे उघडून पहा गडयांनो झापड लावू नका' ही विज्ञान कविता मिळवून वाच.

हे करुन पहा -

खालील शब्द प्रत्येकी पाच वेळा जसेच्या तसे लिही -

1. प्रथितयश
2. मनःकामना
3. मनस्ताप
4. माहात्म्य
5. विपरीत

@KTBS NOT TO BE REPUBLISHED


5. राष्ट्रीय खेळ - हॉकी

X5V3V7

-संकलित

आपले आरोग्य म्हणजे सर्वश्रेष्ठ धनसंपदा ! आरोग्य चांगले राहण्यासाठी खेळ आणि व्यायामाची नितांत गरज आहे. खेळामुळे शरीर सुदृढ रहाते, मन कणखर बनते, आत्मविश्वास वाढतो आणि स्फूर्ती येते. सांघिक भावना निर्माण होते. आणि मनोरंजनही होते.

आपल्या देशात खो-खो, बॅडमिंटन, क्रिकेट, कुस्ती, हॉकी, फुटबॉल, व्हॉलीबॉल, कबड्डी असे मैदानी खेळ तर कॅरम, बुद्धिबळ, इ. बैठे खेळ खेळले जातात.



NOT TO BE REPUBLISHED

यापैकी हॉकी हा खेळ भारताचा राष्ट्रीय खेळ होय. क्रिकेट म्हणजे जसे ब्रॅडमन, सचिन तेंडुलकर; फुट्बॉल म्हणजे जसे पेले; तसे भारतीय हॉकी म्हणजे ध्यानचंद! ते भारतीय सैन्यात 'मेजर' या अधिकार पदावर होते. त्यांनी केलेल्या आंतरराष्ट्रीय हॉकी सामन्यांतील विक्रमामुळे त्यांचे आणि भारताचे नाव जागतिक हॉकी क्षेत्रात व आंतरराष्ट्रीय क्रीडाक्षेत्रात अजरामर झाले आहे आणि म्हणूनच मेजर ध्यानचंद यांना 'हॉकीचे जादूगार' असे म्हटले जाते.

इतर परदेशी खेळांप्रमाणे हॉकी हा खेळसुध्दा भारतात आला तो गोऱ्या सैनिकांद्वारे, आणि भारतीय सैनिकांमार्फतच त्याला जास्त प्रसिद्धी मिळत गेली. हॉकी खेळाचा जन्म साधारणपणे अडीच हजार वर्षापूर्वी ग्रीस देशात झाला असावा असा तज्ज्ञांचा कयास आहे. त्यानंतर आयर्लंड, स्कॉटलंड, वेल्स आणि हॉलंडमध्ये हा खेळ खेळला जाऊ लागला. पूर्वी

हा खेळ आयर्लंडमध्ये 'हर्ली', स्कॉटलंड मध्ये 'शिंटी' तर वेल्समध्ये 'बॅडी' या नावाने खेळला जात असे.

1840 पर्यंत हॉकी खेळाला नियम, कायदेकानून वगैरे काहीच नव्हते. पण पुढे विंबल्डन हॉकी क्लबने हॉकीचे नियम बनविले. त्यामुळे स्त्रिया व लहान मुले यांनासुध्दा हॉकी या खेळात प्रवेश मिळाला आणि ऑलिंपिक सामान्यामध्येही हॉकीचा समावेश करण्यात आला. प्रचंड शारीरिक क्षमता, विजेसारखी चपळाई, भन्नाट वेग व चेंडूवर ताबा मिळविण्याचे कसब या गोष्टी हॉकी या खेळात फार महत्वाच्या आहेत.

हॉकी हा खेळ आता युक्तीचा खेळ झाला आहे. धिप्पाड, किरकोळ शरीरयष्टीचे पण तीक्ष्ण नजरेचे, लवचिक व चपळ हालचाल करू शकणारे खेळाडू हॉकी खेळात असावे लागतात. या उपजत गुणांवरच आपला भारत देश हॉकी खेळावर आपले वर्चस्व टिकवून आहे.


हॉकी हा खेळ निव्वळ प्रतिष्ठित खेळ न ठरता तो अनेक देशांचा राष्ट्रीय खेळ बनला आहे. केनिया, जपान, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया, पाकिस्तान व भारत या देशात हॉकी अत्यंत लोकप्रिय आहे. हा खेळ खेळण्यासाठी हॉकी स्टिक लाकडी असते तिचा आकार छत्रीच्या दांडयासारखा असतो. ती डाव्या बाजूला कांहीशी चपटी तर दुसऱ्या बाजूला गोल असते. स्टिकचे वजन पुरुषांसाठी 798 ग्रॅमपेक्षा जास्त नसावे व महिलांसाठी 652 ग्रॅम पेक्षा जास्त नसावे. स्टिकच्या खालच्या बाजूस 'ण' आकाराचे वळण असते. या वळणातून दोन इंच व्यास असलेला चेंडू सहज निघून जाऊ शकतो.

हॉकीचा चेंडू पांढऱ्या रंगाचा असतो. त्याच्यात कॉर्क भरलेला असतो आणि वरुन तो चामडीने शिवलेला असतो. या चेंडूचे वजन 163 ग्रॅम असते. हॉकी चे खेळाडू टी शर्ट अगर जर्सी, हाफ पँट व बूट आणि शिनगार्ड असा पोषाख वापरतात. दोन्ही संघाचे गोलकीपर दोन्ही हातात ग्लोव्हज, पायात बूट, पॅड आणि डोक्याला शिरस्त्राण वापरतात. या खेळात अकरा खेळाडूंचा संघ असतो व तीन राखीव खेळाडू असतात.

हॉकी खेळाचा वेळ 35-35 मिनिटांच्या दोन अवधींचा असतो. मध्यंतराची विश्रांती पाच मिनिटांची असते. वेळ संपल्यावर बरोबरी झालेली असल्यास पाच मिनिटे जादा खेळ होतो व त्यातही जर निकाल लागला नाही तर प्रत्येक संघास पाच-पाच पुश दिले जातात. ज्यांचे जास्त गोल होतील तो संघ विजयी म्हणून घोषित केला जातो. हॉकी खेळासाठी दोन पंच असतात. प्रत्येक जण मैदानाच्या अर्ध्या भागावर नियंत्रण ठेवतो. जसाजसा चेंडू सरकेल तसे तसे त्यांना धावावे लागते.

@KTRS NOT TO BE REPUBLISHED

हॉकी हा खेळ आयताकृती मैदानात खेळविला जातो. मैदानाची लांबी 100 यार्ड (91.4 मीटर) व रुंदी 60 यार्ड (54.24 मीटर) असते. मैदान हे 3 इंच रुंद अशा रेषेने आखलेले असते. क्रीडांगणाचे दोन समान भाग करणाऱ्या व गोलरेषांशी समांतर असणाऱ्या रेषेस मध्यरेषा असे म्हणतात. हद्दीच्या रेषांना सिमारेषा असे म्हणतात.



हॉकी क्रीडांगण

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

गोलरेषेच्या मध्यभागी दोन लाकडी खांबामध्ये एक गोल पोस्ट असते. गोलपोस्टच्या मागे जाळी बांधलेली असते. आतल्या बाजूस लाकडाचा बोर्ड लावलेला असतो. गोल पोस्टला पांढरा रंग लावतात. दोन्ही उभ्या खांबांपासून दोन्ही बाजूंना गोलरेषेपासून खांबांच्या रेषेपर्यंत कंस काढतात. हे गोल फटकवण्याचे वर्तूळ होय.

ज्या वेळी एखादा खेळाडू स्टिकने चेंडूला मारुन गोलपोस्ट मधून क्रॉसबार पार करतो तेव्हा गोल झाला असे मानतात. ज्या भागात खेळताना फाऊल होतो त्या ठिकाणी फ्री हिट दिली जाते. चेंडू काही वेळा रेषेच्या बाहेर गेला तर पुश (ढकलून) करुन तो पुन्हा खेळात आणतात. 'पेनल्टी कॉर्नर' हा पेनल्टी स्ट्रोक दिला जातो. नियमाविरुद्ध खेळल्यास दंडात्मक कारवाई केली जाते.

शरीर निकोप ठेवून संपूर्ण शरीराला व्यायाम देऊन मनाची एकाग्रता वाढविणारा हा एक चांगला खेळ आहे.

नवीन शब्दार्थ

नितांत	-	फार
सांघिक	-	संघभावना
भन्नाट	-	अतिशय, प्रचंड
निकोप	-	रोगमुक्त, निरोगी
सुदृढ	-	सशक्त
कयास	-	कल्पना
यार्ड	-	तीन फूट लांबीचे मापन
कसब	-	कौशल्य
वर्चस्व	-	हुकुमत
प्रतिष्ठित	-	आदराचे स्थान
शिरस्त्राण	-	डोक्यावरील सुरक्षा कवच/किंवा हेल्मेट
ग्लोव्हज	-	हातातील मोजे

स्वाध्याय

अ. एका वाक्यात उत्तरे लिही.

1. भारताचा राष्ट्रीय खेळ कोणता?
2. 'हॉकीचा जादूगार' असे कोणाला म्हणतात?
3. हॉकी या खेळात कोणकोणत्या साधनांचा वापर केला जातो?
4. हॉकीच्या खेळाच्या मैदानाची लांबी व रुंदी किती असते?
5. हॉकी या खेळाचा अवधी किती मिनिटांचा असतो?
6. गोल केव्हा झाला असे मानतात?

आ. योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण कर.

1. पूर्वी आयर्लंड मध्ये हॉकी हा खेळ ..... या नावाने खेळला जात असे.
   अ. शिंटी ब. हर्ली क. बॅडी ड. हॉकी
2. गोलरेषांशी समांतर असणाऱ्या रेषेस ..... म्हणतात.
   अ. गोलरेषा ब. निदान रेषा क. मध्यरेषा ड. अंत्यरेषा
3. हॉकी खेळामध्ये .....रंगाचा चेंडू असतो.
   अ. पांढरा ब. लाल क. पिवळा ड. काळा

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

इ. दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिही.

1. खेळामुळे आपल्याला कोणकोणते फायदे होतात?
2. हॉकी या खेळात कोणत्या गोष्टी फार महत्वाच्या आहेत?
3. हॉकी या खेळातील स्टिक्सचे वर्णन कर.
4. तुझ्या शब्दात हॉकी या खेळाचे वर्णन कर.

ई. खालील खेळाडू व खेळ यांच्या जोड्या जुळव.

1. सचिन तेंडुलकर	अ) नेमबाज
2. पेले	आ) बुद्धिबळ
3. ध्यानचंद	इ) क्रिकेट
4. अभिनव बिंद्रा	ई) हॉकी
5. विश्वनाथन आनंद	उ) फुटबॉल

उ. खालील खेळांचे मैदानी खेळ व बैठे खेळ असे वर्गीकरण कर

कबड्डी, कॅरम, क्रिकेट, बुद्धिबळ, खो-खो, फुटबॉल, टेनिस, हॉकी, सारीपाट, बास्केट बॉल.

ऊ. शिक्षकांच्या मदतीने पुढे काही जोडून येणारे शब्द ओळख पाहू.

1	फौ	ज	फा	टा		
2	प	ड				
3	गो	ड				
4	का	म				
5	स	गे				
6	का	ळा				
7	वा	द				
8	ध	र				
9	उ	र	ला			
10	ह	म	री			
11	सा	मा	न			
12	सा	र	वा			

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

माहिती करुन घे :

भारताने ऑलिंपिक स्पर्धेत हॉकीमध्ये कोठे व कोणती पदके मिळविली हे वाच आणि समजून घे.

सन	ठिकाण	मिळविलेले पदक
1928	पॅरीस	सुवर्ण पदक
1932	लॉस एंजलिस	सुवर्ण पदक
1936	बर्लिन	सुवर्ण पदक
1948	लंडन	सुवर्ण पदक
1952	हॅलसिंकी	सुवर्ण पदक
1956	मेलबोर्न	सुवर्ण पदक
1960	रोम	रजत पदक
1964	टोकियो	सुवर्ण पदक
1968	म्युनिच	कास्य पदक
1980	मॉस्को	सुवर्ण पदक

© MSCERT NOT TO BE REPUBLISHED

खेळात दिली जाणारी प्रथम तीन पदके

1. गोल्ड मेडल - सुवर्ण पदक
2. सिल्वर मेडल - रौप्य/रजत पदक
3. ब्राँझ मेडल - कास्य पदक

भाषाभ्यास

शब्दयोगी अव्यय

शब्दयोगी अव्ययांना स्वतःचा अर्थ असतो त्यानुसार या अव्ययांचे अनेक प्रकार होतात. त्यांचा तुम्ही पुढील इयत्तेत अभ्यास कराल.

वाक्यातील काही शब्द क्रियाविशेषण व शब्दयोगी या दोन्ही अव्ययात येतात. त्या अव्ययाच्या स्थानावरुन दिलेला शब्द क्रियाविशेषण अव्यय आहे, की शब्दयोगी अव्यय आहे ते ओळखावे.

शब्दयोगी अव्यय	क्रियाविशेषण अव्यय
1) घरासमोर लहान बाग आहे.	1) अगं, समोर बघून चल.
2) झाडाखाली बस.	2) आंबे खाली टाकू नको.
3) माझ्या आधी तू आलास.	3) आधी, तू दूध पी.
4) घरावर कावळा बसला आहे.	4) वर चढून आंबे काढ.
5) जेवणानंतर आईसक्रीम खा.	5) गुलाबाची फुले नंतर आणूया.

नाम अथवा सर्वनामाला जोडून अव्यय आहे.	स्वतंत्र अव्यय आहे

स्वाध्याय

खालील वाक्यातील शब्दयोगी अव्यय व क्रियाविशेषण अव्यय ओळख.

1. दिव्याखाली अंधार.
2. माझ्याजवळ दहा रुपये आहेत.
3. वर ठेवलेली पुस्तके खाली आण.
4. कारक म्हणजे बदल होणारे.
5. तुला मी आधी कळविले होते.
6. काटयावाचून गुलाब नाही.
7. नुकसानकारक घटना घडू नये.
8. पुस्तकातून ज्ञान घ्यावे.



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

6. डॉ चंद्रशेखर व्यंकटरामन

K2Q5Y5

-संकलित



भारताला विज्ञानातील सर्वप्रथम नोबेल पारितोषिक मिळवून देणारे ज्येष्ठ शास्त्रज्ञ संशोधक म्हणजे, भारतरत्न सर चंद्रशेखर व्यंकटरामन होय. त्यांना भौतिक शास्त्राचा अत्यंत मानाचा असा नोबेल पुरस्कार 1930 साली मिळाला.

सर चंद्रशेखर व्यंकटरामन यांना सर्वत्र सर सी.व्ही. रामन असेही ओळखले जाते. त्यांचा जन्म 7 नोव्हेंबर 1888 साली तामिळनाडू मधील तिरुचेरापल्ली (त्रिचनापल्ली) जवळील थिरुवनैकवल्ल या गावी झाला. त्यांच्या वडिलाचे नाव चंद्रशेखर अय्यर व आईचे नाव पार्वती अम्मा (सप्तर्षी पार्वती) असे होते. त्यांच्या घरातील पार्श्वभूमी ही शिक्षणाला अनुकूल होती. त्यांचे वडीलही सुरुवातीला एका शाळेत शिक्षक होते. पण शिक्षणाची आवड असल्याने तेही पुढे पदवीधर होऊन प्रेसीडेंन्सि कॉलेज मद्रास येथे प्राध्यापक बनले.

रामन यांची बालपणी प्रकृती ठीक नसायची. त्यामुळे ते कधीच खेळात रमले नाहीत. पण वयाच्या मानाने त्यांची बुद्धिमत्ता मात्र सर्वाना थक्क करुन सोडणारी होती. बालपणी त्यांना वडिलांकडून खूप प्रोत्साहन मिळत असे. तसेच वडिलांच्या अभ्यासू वृत्तीमुळे त्यांनाही प्रेरणा मिळत असे.

आपल्या हुशारीमुळे त्यांनी वयाच्या 11 व्या वर्षीच आपले शालेय शिक्षण पूर्ण केले. केवळ वयाच्या 15 व्या वर्षी ते इंग्रजी आणि भौतिक शास्त्राचे पदवीधर झाले. त्यांनी 16 व्या वर्षी आपले पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. पण शिक्षण पूर्ण केले व ते कलकत्ता येथे अर्थखात्यामध्ये डेप्युटी अकौंटंट जनरल म्हणून नोकरी करु लागले. संशोधक वृत्तीच्या सर रामन यांचे मन त्या नोकरीत कधीच रमले नाही. त्यांनी ती नोकरी सोडून कलकत्ता विद्यापीठामध्ये प्राध्यापकाची नोकरी स्वीकारली. त्यामागे विद्यापीठातील प्रयोगशाळेत निरनिराळे संशोधन करता यावे अशी त्यांची भावना होती.

1921 मध्ये त्यांना कलकत्ता विद्यापीठातर्फे ब्रिटन येथे उच्च शिक्षणासाठी पाठविण्यात आले. त्यावेळी त्यांनी लंडनच्या रॉयल सोसायटी मध्ये 'भारतीय तंतुवाद्ये' 'हा शोधनिबंध

© SCERT NOT TO BE REPUBLISHED

सादर केला. युरोपमधून समुद्रमार्गे भारतात परत येत असताना त्यांच्या मनात ''आकाश निळ्या रंगाचे का दिसते?'' हा प्रश्न त्यांना पडला व त्यांचे संशोधन सुरू झाले. भारतात परत आल्यावर त्यांनी पाणी, बर्फ यांमधून प्रकाशाचे विकिरण (स्कॅटरिंग) यावर संशोधन सुरु केले. त्यातून त्यांना आकाशाच्या निळ्या रंगाबद्दलची उत्तरे मिळाली. या प्रकाशाच्या विकिरणाबद्दल त्यांनी अधिक महत्वपूर्ण गोष्टींबाबत संशोधन करुन काही वैज्ञानिक बाबी जगासमोर आणल्या. त्याच बाबी 'रामन इफेक्ट' म्हणजे 'रामन परिणाम' म्हणून पुढे प्रसिद्ध झाल्या.

त्यांनी आपल्या संशोधनाबाबतचा शोधनिबंध 28 फेब्रवारी 1928 साली प्रसिद्ध केला. या संशोधनाला जगभरातून मान्यता मिळाली व त्यांना याच संशोधनामुळे 1930 साली नोबेल पारितोषिक मिळाले. या अत्यंत मौलिक, अनमोल अशा संशोधनामुळे विकिरणाच्या आण्विक प्रक्रियेसंबंधीचे, रचनेसंबंधीच्या माहितीचे भांडारच जगासमोर खुले झाले. त्यामुळे अनेक बाबींचा अभ्यास करणे सहजसाध्य बनले. 'रामन परिणाम' या संशोधना नंतर केवळ 10 वर्षातच दोन हजारहून अधिक संयुगांच्या क्रांतिकारी शोधामुळे 'रामन परिणाम' हे शास्त्रज्ञांच्या हातातील एक महत्वपूर्ण साधन बनले.

सर सी.व्ही. रामन यांनी अनेक निरनिराळ्या विषयांवर संशोधन केले. त्यांनी तरुण आणि होतकरु वैज्ञानिक संशोधकांना प्रोत्साहन दिले. 1943 साली त्यांनी बेंगळूर येथे 'रामन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सची' स्थापना केली. आजही ती संस्था 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स' या नावाने प्रसिद्ध आहे.

त्यांना भारतातील 16 विद्यापीठांनी आणि जगातील 8 विद्यापीठांनी सन्माननीय अशी डॉक्टरेट पदवी दिली. जगभरातून त्यांना अनेक पदव्या आणि पुरस्कार दिले गेले. आपल्या संशोधनाने ते जगप्रसिध्द झाले. पण त्यांनी आपले भारतीयत्व कधीही सोडले नाही. त्यांना आपल्या देशाबद्दल प्रेम आणि प्रचंड अभिमान होता. त्यांनी आपल्या वेषामध्येही बदल केला नाही. आपल्या मद्रासी जरीकाठी पगडी मुळेच त्यांची ओळख सहज होते.

सर सी.व्ही. रामन यांनी आपला रामन इफेक्टचा शोधनिबंध 28 फेब्रुवारी 1928 रोजी प्रसिद्ध केला. त्याची आठवण म्हणून 1986 साला पासून 28 फेब्रुवरी हा दिवस 'विज्ञान दिन' म्हणून भारतभर मानला जातो.

रामन यांनी केलेल्या संशोधनामुळे जगातील अनेक नव-नवीन शोध लावले गेले. त्यामुळे लोकांचे जीवन सुरक्षित व सुखी होण्यास मदत झाली. अशी अनेक संशोधने करणाऱ्या या थोर शास्त्रज्ञ संशोधकाचे 21 नोव्हेंबर 1970 रोजी निधन झाले. या थोर शास्त्रज्ञाचा भारत सरकारने 1954 साली 'भारतरत्न' हा पुरस्कार देऊन गौरव केला आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

नवीन शब्दार्थ :

ज्ञानलालसा - ज्ञान मिळविण्याची इच्छा, भांडार - खजिना

मौलिक - मूल्यवान, होतकरू - हुशार व गरजू

आण्विक प्रक्रिया - पदार्थांच्या अणुविषयक प्रक्रिया

स्वाध्याय

अ. एका वाक्यात उत्तरे लिही.

1. सर सी.व्ही. रामन यांचे पूर्ण नाव काय?
2. सर सी.व्ही. रामन यांच्या आई वडिलांचे नाव काय?
3. सर सी.व्ही. रामन यांनी 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सची स्थापना कोठे केली?
4. सर सी.व्ही. रामन यांनी लंडनच्या 'रॉयल सोसायटी' मध्ये कोणता शोधनिबंध सादर केला?
5. सर सी.व्ही. रामन यांना भौतिक शास्त्राचा नोबेल पुरस्कार केव्हा मिळाला?

आ. तीन ते चार वाक्यात उत्तरे लिही.

1. सर सी.व्ही. रामन यांचा जन्म केव्हा व कोठे झाला?
2. 28 फेब्रुवारी हा दिवस 'विज्ञान दिन' म्हणून का साजरा केला जातो?
3. सर सी.व्ही. रामन यांनी लावलेल्या शोधामुळे कोणते बदल घडले?

इ. रिकाम्या जागी योग्य शब्द भर.

1. भारत सरकारने ..... साली त्यांना भारतरत्न हा पुरस्कार दिला.
2. त्यांनी 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सची स्थापना ..... साली केली.
3. सी.व्ही. रामन यांनी लावलेला शोध ..... म्हणजेच ..... म्हणून ओळखला जातो.
4. सर सी.व्ही. रामन यांना भारतातील ..... व जगातील ..... विद्यापीठांनी डॉक्टरेट पदव्या दिल्या.
5. सर सी.व्ही. रामन यांचे ..... साली निधन झाले.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

ई. खाली दिलेल्या थोर भारतीय व्यक्तीनी कोणत्या साली व कोणत्या विषयामध्ये नोबेल पारितोषिक मिळविले याची माहिती भर.

अ.नं.	शास्त्रज्ञाचे नाव	विषय	वर्ष
1.	सर सी.व्ही. रामन	भौतिक शास्त्र	1930
2.	रविंद्रनाथ टागोर		
3.	अमर्त्य सेन		
4.	हरगोविंद खुराणा		
5.	मदर तेरेसा		
6.	सुब्रमण्यम् चंद्रशेखर		

उ. खालील शब्दांचे विरुद्ध अर्थी शब्द लिही.

1. मौलिक × .....
2. साध्य × .....
3. आवड × .....
4. परकीय × .....
5. सुप्रसिद्ध × .....

ऊ. कंसातील योग्य शब्द वापरुन खालील म्हणी पूर्ण कर.

(मीठ, पाणी, पाने, साखरेचे, पोळी)

1. नावडतीच्या हातचे ..... अळणी.
2. पळसाला ..... तीनच.
3. तळे राखील तोच ..... चाखील.
4. ..... खाणार त्याला देव देणार.
5. ज्याची खावी ..... त्याची वाजवावी टाळी.

❋ उपक्रम

1. निरनिराळ्या शास्त्रज्ञांची चित्रासह माहिती संग्रहित करुन शिक्षकांच्या सहाय्याने हस्तलिखित तयार कर.
2. विज्ञानशिक्षकांच्या मदतीने ''रामन परिणाम'' शोधाबद्दल माहिती मिळव.
3. शिक्षकांच्या मदतीने शाळेत ''विज्ञान दिना'' निमित्त विज्ञानमेळावा भरव.

हे ही करुन पहा.

खालील शब्द प्रत्येकी पाच वेळा जसेच्यातसे लिही.

1. घेऊन
2. निःसत्व
3. श्रेष्ठ
4. पृथक्करण
5. राजाभाऊ

@KBPS NOT TO BE REPUBLISHED

भाषाभ्यास

उभयान्ययी अव्यय

खालील वाक्ये वाच.

1. मी बाजारातून पेन आणि शाई आणली.
2. सचिन धावत आला आणि चेंडू घेऊन गेला.
3. सरिना सर्वांची चेष्टा करते, म्हणून आईकडून मार खाते.
4. बाबांनी माझ्यासाठी दप्तर व पुस्तक आणले.
5. तू किंवा तुझा भाऊ, दोघांपैकी एकटाच यायला हवा.
6. पाऊस पडला, परंतु त्याचा शेतीला उपयोग नाही.
7. आम्ही लिंबूपाणी पितो कारण की ते आरोग्यवर्धक आहे.
8. तो लवकर घरी गेला कारण त्याची आई आजारी आहे.
9. माझ्यासोबत कोणी येवो वा न येवो, मी नाटकाला जाणारच.
10. देह जावो अथवा राहो। पांडुरंगी दृढ भावो.

वरील वाक्यांमध्ये आणि, म्हणून, व, किंवा, परंतु, कारण की, कारण, वा, अथवा हे अव्यय आहेत. त्यामुळे दोन शब्द किंवा दोन वाक्ये जोडली आहेत.

दोन शब्द किंवा दोन वाक्यांना जोडणाऱ्या अविकारी शब्दांना उभयान्वयी अव्यय असे म्हणतात.

(उभय - दोन, अव्यय - संबंध)

उभयान्वयी अव्ययांच्या प्रकारानुसार येणाऱ्या शब्दांचा अभ्यास करा.

1. समुच्चय बोधक - आणि, व, अन, शिवाय, आणखी, नी.
2. विकल्प बोधक - अथवा, किंवा, वा, नाहीतर, की.
3. न्यूनत्व बोधक - पण, परंतु, किंतु, बाकी.
4. परिणाम बोधक - म्हणून, याकरिता, सबब, केव्हा.
5. कारण बोधक - कारण, का, की, कारणकी.
6. उद्देश बोधक - म्हणून, यासाठी, याकरिता, सबब.
7. संकेत बोधक - जर-तर, जरी-तरी, की, जर

स्वाध्याय - शिक्षकांच्या मदतीने या उभयान्वयी अव्ययांचा वापर करुन वाक्ये तयार कर.



© MKTBS NOT TO BE REPUBLISHED

7. आठवणींचे गाव



आठवणींचा गाव असावा
जिव्हाळ्याच्या घराभोवती,
पिंपळाचा पार असावा
आपुलकीच्या गप्पांभोवती.

गावाकडेने नदी असावी
निळा पोपटी पहाटवारा,
हिरव्या पाऊलवाटांनी
पापणीचा भिजे किनारा.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

तिथे असावी गर्द आमराई
निळेनिळे आकाशही वरती,
रुसवे, फुगवे, सुरपारंब्या,
आनंदाला यावी भरती.

तिथे असावा अथांग सागर
आकांक्षांचे माड असावे,
दिल्या-घेतल्या सुखदुःखाचे
आठवणींचे झाड असावे.

ढवळ्या-पवळ्या बैल आणिक
गोठ्यात कपिला गाय असावी,
मोरपिसांचा पदर लेवूनि,
आठवणींच्या गावी जावे.

.... कवी - सदानंद सिनगारे

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

नवीन शब्दार्थ

आमराई - आंब्याच्या झाडांची बाग
पार - झाडाच्या भोवतीचा कट्टा
अथांग - अतिशय खोल
सुरपारंब्या - वडाच्या पारंब्यावर खेळला जाणारा एक खेळ.
आकांक्षा - अपेक्षा
आपुलकी - प्रेम, ममता, आपलेपणा
गर्द - दाट
माड - नारळाचे झाड
जिव्हाळा - प्रेम, आपुलकी, माया

स्वाध्याय

अ. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिही.

1. जिव्हाळ्याच्या घराभोवती काय असावे?
2. पापणीचा किनारा कशानी भिजतो?
3. गोठ्यात कोण कोण असावे असे कवीला वाटते?
4. कवी कोठे जाणार आहे?

आ. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिही.

1. आनंदाला भरती केव्हा व कशी यावी?
2. 'तिथे असावा अथांग सागर
   आकांक्षांचे माड असावे,
   दिल्या - घेतल्या सुखदुःखाचे
   आठवणींचे झाड असावे.'
   (वरील ओळींचा अर्थ तुझ्या शब्दात लिही.)


इ. कवितेत आलेली खालील शब्दांची विशेषणे ओळखून लिही.

1. ..... सागर
2. ..... आमराई
3. ..... आकाश
4. ..... पहाटवारा
5. ..... पाऊलवाटा
6. ..... पदर

ई. खालील शब्दांना येणारे समानअर्थी शब्द निवड व रिकाम्या जागी लिही.

1. आंब्याची बाग
2. प्रेम, आपलेपणा
3. मान, वडीलधाऱ्यांचा हा करावा
4. लक्षात ठेवणे, सय
5. अन्न, हा प्रत्येक सजीवाला आवश्यक असतो.
6. आपल्याला बसण्यासाठी याची आवश्यकता असते.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED



❋ उपक्रम :

1. 'माझे गाव' ही केशवसुतांची कविता मिळवून तिचे वर्गात चालीवर सादरीकरण कर.
2. 'माझा गाव' यावर पंधरा ओळींचा निबंध लिही.

हे ही करुन पहा.

खालील शब्द प्रत्येकी पाच वेळा जसेच्या तसे लिही.

1. अधीन
2. ज्योती
3. उद्देश
4. क्रूर
5. सारवून

भाषाभ्यास

अलंकार

अलंकारांनी शरीराला शोभा येते. जसे अलंकार पाहताना डोळ्यांना आणि मनाला आनंद होतो त्याचप्रमाणे भाषेला शोभा देणारे व मनाला आनंद देणारे काही गुणधर्म आहेत. त्यांना भाषेचे अलंकार म्हणतात.

भाषेतील अलंकाराचे दोन मुख्य प्रकार आहेत.

1. शब्दालंकार
2. अर्थालंकार

शब्दालंकार - भाषेला शब्दांच्या चमत्कृतीनी जी शोभा येते. अशा अलंकाराला शब्दालंकार म्हणतात.

शब्दालंकाराचे तीन प्रकार आहेत.

(अ) अनुप्रास (आ) यमक (इ) श्लेष

(अ) अनुप्रास -

खालील ओळी वाच व अधोरेखित अक्षरांकडे नीट लक्ष दे.

1. काळेंच्या कागद कारखान्यातील कामगार कारखान्यात कंबर कसून काम करतात.
2. पर्वताच्या पायथ्याशी पांडुरंगाने पांढरे पक्षी पाहिले.

©KTRS NOT TO BE REPUBLISHED

3. वाजत गाजत साजत आज। तयाजतन करुनी आणा हो।

4. गडद निळे गडद निळे जलद भरुनि आले
शीतल तनु चपल चरण अनिलगण निघाले
रजतनील ताम्रनील, स्थिरपल जल पल सलील
हिरव्या तटि नावांचा कृष्ण मेळ खेळे

एखाद्या वाक्यात किंवा कवितेच्या चरणात एकाच अक्षराची पुनरावृत्ती होऊन त्यातील नादामुळे जेव्हा सौंदर्य प्राप्त होते तेव्हा अनुप्रास अलंकार होतो.

(आ) यमक

(अ) सुसंगति सदा घडो, सुजनवाक्य कानी पडो।
कलंक मतिचा झडो, विषय सर्वथा नावडो।

(आ) श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे
क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरुनी ऊन पडे

(इ) देवाजीने करुणा केली
भाते पिकुनी पिवळी झाली

(ई) सांग सांग भोलानाथ पाऊस पडेल का ?
शाळेभोवती तळे साचून सुट्टी मिळेल का ?

कवितेतील ओळींच्या शेवटी ठराविक अक्षरे आल्यामुळे नाद निर्माण होतो. अशा रचनेला 'यमक' असे म्हणतात.

(इ) श्लेष -

हा अलंकार शब्दालंकार तसेच अर्थालंकार या दोहोंत येतो, त्यामुळे याला 'उभयालंकार' असेही म्हणतात.

शब्दश्लेष -

शब्दश्लेषात अनेक अर्थांनी योजलेल्या विशिष्ट शब्दाला फार महत्व असते.

उदा. अहो कोट्याधीश या !

कोट्याधीश - धनवान मनुष्य, कोट्यावधीच्या संपत्तीचा मालक

कोट्याधीश - कोट्या करणारा, शब्दातून विनोद करणारा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

8. परोपकाराचे फळ

F4F8L5

-संकलित

''आपलं घर लुटलं जाऊन आठवडा झाला. चोरांनी घरात एक पैसा, दाणाही शिल्लक ठेवला नाही. गावाबाहेरचं हे घर नको, म्हणून मी दाताच्या कण्या केल्या; पण तुम्ही त्यावेळी ऐकलं नाही.''

''जाऊ दे ग, रत्ना! आपल्या जवळ काहीच नसतं, तर त्यांनी काय नेलं असतं? पैसाअडका, दागदागिने जमवू नकोस असं म्हटलं, तर तू ऐकलं नाहीस. आमचं हे वैद्यकीय ज्ञान पैसा कमवण्यासाठी नाही, समाजाच्या सेवेसाठी आहे. आपल्याला थोडंफार समाजाकडून मिळालं की झालं.''

''काय डोंबल मिळणार समाजाकडून? चोरी झालेल्या दिवसापासून एका पैशाची मिळकत नाही. माझ्या माहेराहून मिळालेले माझे सोन्याचे दागिनेही गेले. सगळंच लुटलं गेलं. आता जगायचं कसं?''

''सगळं कुठं लुटलं गेलं, रत्ना? औषधांच्या बाटल्यांना चोरांनी हात लावला नाही. माझं वैद्यकीय प्राविण्य तर कोणीच चोरु शकत नाही.''

''कसलं प्राविण्य कोण जाणे! उद्याच्या दुपारच्या जेवणाची ददात आहे.''

ढ्ण.... ढ्ण.... दूरच्या घड्याळातून दहाचे ठोके ऐकू आले. वैद्यांच्या घरचा बाहेरचा दरवाजा लावलेला होता. आतल्या छोट्या खोलीत वैद्य व त्यांची बायको बोलत बसले होते.

कृष्णपक्षातील चतुर्दशीची रात्र होती. घराला चहुबाजूंनी अंधाराने घेरले होते. एकाएकी वैद्यांना बाहेरुन हाक ऐकू आली.

''मालक ..... अहो..... मालक''

वैद्यांनी चट्कन बाहेर येऊन दार उघडले. अंधारात मशाल हातात धरून तिघे उभे होते. तिघेही काळे व धिप्पाड होते. डोक्यावर वाढलेले केस अस्ताव्यस्त पसरलेले, विजार घातलेली, अंगावर काळी घोंगडी घेतलेली. वैद्य त्यांच्याकडे क्षणभर पाहून म्हणाले,

''आज तुम्हाला इथं काहीही मिळणार नाही. आठवडयापूर्वीच सारं चोरीला जाऊन घर रिकामं झालंय. मूठभर धान्यसुध्दा घरात नाहीये!''

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

आलेल्यापैकी एकजण म्हणाला, ''आम्ही चोरी करायला आलो नाही मालक, औषधासाठी आलोय.''

''औषधासाठी? कुणासाठी औषध?'' वैद्यांनी चौकशी केली.

''आमच्या धन्याच्या मुलासाठी मालक! त्यांना एकुलता एक मुलगा आहे. चारपाच दिवसांपासून तापलाय. आज तर तो नुसता तळमळतोय. कसही करुन तुम्हाला घेऊन यायचच असं आमच्या धन्यानी बजावलंय. म्हणून तुमच्याकडे आलोय. आपण चलावं, मालक''. त्यातला एक विनवणीच्या सुरात म्हणाला.

''कोण तुमचा धनी?''

''पारधी, गावचा भीमनायक!''

''म्हणजे ..... तो चोरांचा गुरु?'' वैद्यानी अचंब्याच्या सुरात विचारले.



चाचरत एकजण बोलू लागला, ''होय मालक, तो चोरांचा गुरु आहे खरा, पण आता तुम्ही यायलाच हवं. त्याला तेवढा एकच मुलगा आहे. तो त्याला जीव की प्राण आहे.''

NOT TO BE REPUBLISHED

वैद्यानी क्षणभर विचार केला. मग ''आता येतो, जरा थांबा'' असे सांगून आत गेले. निघायची तयारी केली. बायकोला दार नीट लावून घ्यायला सांगितलं आणि बाहेर येऊन म्हणाले, ''कुठं जायचंय? चला.''

गर्द अंधारी रात. जंगलातील वाट. यमदूतासारख्या भासणाऱ्या त्या तिघांनी धरलेल्या मशालीच्या उजेडात वैद्य चालत राहिले. वैद्याच्या मनात विचित्र विचार येत होते. 'हे लोक आपल्याला फसवणार तर नाहीत ना? नको म्हटलं तरी पोलिसांनी आपल्या घरातील चोरीचा तपास चालूच ठेवला आहे. त्यामुळे यांचा मला मारायचा तर विचार नाही ना? तसं झालं तर रत्नाच काय होणार?''

''ओ..... मालक साप, साप....'' त्यातला एक ओरडला. वैद्य दचकून जागे झाल्यासारखे झाले. ते पाहतात तर दोन हात अंतरावर एक नाग आपला लांबलचक देह सरकावत पुढे जात होता. चौघेही बाजूला होऊन त्याच्याकडे पाहत राहिले. नाग निघून गेला. चौघेही पुढे चालू लागले.

वैद्य पुन्हा विचार करु लागले. 'सापासारखा प्राणीसुध्दा छेड काढली तरच चावतो ; पण माणूस? त्याची तऱ्हा वेगळीच! छेड काढली नाही, तरी सर्वांना चावणार! चोरापासून सम्राटापर्यंत सर्वांना संपत्तीचा लोभ आहेच! मग माझ्या रत्नालाच का आपल्या दागदागिन्यांचा लोभ नसावा? ती पण या जगातल्या माणसापैकीच एक आहे! माझ्या रत्नाला मी तरी परत मिळतो की नाही कोणास ठाऊक?''

जंगलातील पायवाट संपून चौघेही एका छोट्या खेड्यात आले. कुत्री भुंकायला लागली. वैद्याची छाती धडधडायला लागली. चालतांना पाय थरथरत होते. चौघेही एका घरासमोर आले. घरात पाऊल ठेवायचा अवकाश, एक अक्राळ विक्राळ माणूस समोर आला. वैद्यांच्या अंगावर शहारे आले. वैद्यांचे पाय घट्ट पकडून तो म्हणाला, ''अगदी देवासारखे आलात. दया करा, अन माझ्या मुलाला वाचवा.''

वैद्यानी त्याचे हात पकडून त्याला वर उभे केले. त्यांना त्या अक्राळ विक्राळ चेहऱ्यातला दीनपणा जाणवला. तसेच त्याचे हात पकडून मुलाच्या खोलीत गेले. मिणमिणत्या मंद प्रकाशात अंथरुणात तळमळणारा जीव पाहिला. शेजारी बसलेली मुलाची आई हुंदके देत रडत होती.

© KTDS NOT TO BE REPUBLISHED

वैद्यानी मुलाची नाडीपरीक्षा केली. 'घाबरु नका' असा आईवडिलानी धीर देत त्यांनी मुलाला औषध पाजले. चारपाच मिनिटात तो मुलगा डोळे मिटून झोपला.

तीनचार मिनिटे शांततेत गेली. ''आजचा दिवस असाच गेला असता, तर तुमचा मुलगा तुमच्या हाती लागला नसता. देवाने मलाही बुध्दी दिली. मी आलो. भीमण्णा, रक्षण करणं हे देवाचं काम आहे, मारणं हे राक्षसाच काम आहे. रक्षण करण्याचे काम मनापासून करणाऱ्याच्या पाठीशी देव असतो!''

''रक्षण करणं हे देवाचं काम..... मारणं हे राक्षसाचं काम'' हे शब्द भीमनायकाच्या मनाला भिडले. त्याच्या मनात प्रश्न उभा राहिला. ''मी रक्षण करण्याचे काय काम केलं आहे? काही नाही. मग देव मला काय मदत करणार?''



तेवढ्यात मुलगा जागा झाला. हलक्या आवाजात त्याने 'अप्पा' अशी हाक मारली. आईवडिलांनी त्याला अतिशय आनंदाने मिठी मारली. मुलाचे डोळे लख्ख उघडले. त्याचे अंग घामाने डबडबले, ''बाळाला घाम आलाय'' आई थरथरत्या आवाजात म्हणाली.

''देव दयाळू आहे. तो कोणाचं वाईट करत नाही.'' वैद्य समाधानाने गहिवरलेल्या आवाजात म्हणाले.

पुन्हा एकदा औषध पाजेपर्यंत कोंबडा आरवायची वेळ झाली. ''बाई, हा घ्या तुमचा मुलगा. आता घाबरायचे कारण नाही.'' वैद्य असे सांगताना मुलाचे आईवडील त्यांच्याकडे कृतज्ञतापूर्वक नजरेने पाहात होते. वैद्याना ते अक्राळ विक्राळ आकाराचे पारधी न वाटता साधी माणसे वाटली. उजाडल्यानंतर वैद्य आपल्या घरी निघाले. भीमनायक त्यांच्या पाया पडला. ''तो न दिसणारा देव; तुम्ही मात्र मला दिसणारे देव आहात. तुमचे उपकार मी कधीही विसरणार नाही.''

दुसऱ्या दिवशी अमावस्येची काळीकुट्ट रात्र होती. रात्रीचे दहा वाजले होते. घराचा पुढचा दरवाजा उघडाच होता. पुढच्याच खोलीत नवरा बायको बोलत बसली होती. बायको म्हणाली, ''तुमच्या वैद्यकीय प्राविण्याला मिळालेली फळं लक्षात आली बरं का.... पायभर टोचलेले काटे..... पायाला लागलेली ठेच..... झोपमोड..... उपासमार!''

''असे का बोलतेस रत्ना? माझ्या वैद्यकीय प्राविण्याने एका आईला आनंद दिला..... एका वडिलांचा वंश वाढला. ते जाऊ दे.... आज औषधासाठी त्यांच्यापैकी कोणीही आलं नाही. एवढ्यात येऊन जायला हवे होते.''

वैद्य बोलत असतानाच आदल्या दिवशी बोलवायला आलेले पारधी डोक्यावर गाठोडी वाहून आत आले. त्यांच्या पाठोपाठ भीमनायकही आत शिरला. येता येताच वैद्यांना नमस्कार करत तो म्हणाला, ''देवाचे दागिने आणि वस्तू देवाला अर्पण करायला आलोय. मालक, मला क्षमा करा. दया करुन हे सारं घ्या.''

दोघांनी ती गाठोडी उघडून ठेवली. वैद्यांच्या घरी चोरी झालेल्या सर्व वस्तू त्यात होत्या.

भीमनायक पुन्हा बोलू लागला, ''आपलं अंथरुण माझ्या मुलाच्या शेजारी आहे. तेवढं मात्र आणलं नाही. आपले आशीर्वाद म्हणून ते माझ्या मुलासाठी राहू दे, मालक.''

नवराबायकोच्या तोंडून शब्द फुटेना. भरुन आलेल्या अंतःकरणाने वैद्य आपल्या बायकोकडे पाहात होते. बायको आश्चर्य भरलेल्या डोळ्यानी एकदा वैद्याकडे, एकदा भीमनायकाकडे पाहात होती. तिच्या चेहऱ्यावर समाधानाचे मंद हास्य उमलले होते.

(मूळ कन्नड लेखकः बेटगेरी कृष्णशर्मा. मराठी अनुवादः मीना वांगीकर)

NOT TO BE REPUBLISHED @KTDS

नवीन शब्दार्थ :

दाताच्या कण्या करणे	-	वारंवार विनंती करणे
अचंबीत होणे	-	आश्चर्यचकित होणे
अर्पण करणे	-	देणे
ददात असणे	-	कमतरता असणे

स्वाध्याय

अ. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिही.

1. चोरांचा धनी कोण होता?
2. वैद्याच्या पत्नीचे नाव काय होते?
3. वैद्याचे घर कोठे होते?
4. अक्राळ विक्राळ माणसाने वैद्याना कोणती विनंती केली?
5. गाठोड्यातून चोरांनी काय आणले होते?

आ. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिही.

1. वैद्याची पत्नी वैद्यावर का रागावली होती?
2. चोरांच्या बरोबर जाताना वैद्याच्या मनात कोणते विचार आले?
3. चोरांचा अवतार कसा होता?
4. चोरांच्या धन्याचे मनपरिवर्तन कसे झाले?
5. वैद्याच्या पत्नीच्या चेहऱ्यावर मंद हास्य का उमलले?

इ. खालील वाक्ये कोणी कोणाला म्हटली ते लिही.

1. ''काय डोंबल मिळणार समाजाकडून.''
2. ''आपलं अंथरुण माझ्या मुलाच्या शेजारी आहे. तेवढं मात्र आणलं नाही.''
3. ''आम्ही चोरी करायला आलो नाही, मालक, औषधासाठी आलोय.''
4. ''आमचं हे वैद्यकीय ज्ञान पैसा कमविण्यासाठी नाही, समाजाच्या सेवेसाठी आहे.''

ई. खालील वाकप्रचारांचा अर्थ सांग -

1. दाताच्या कण्या करणे.
2. ददात असणे.

© KTRS NOT TO BE REPUBLISHED

3. पाय थरथर कापणे.

4. अंगावर शहारे येणे.

5. अंतःकरण भरुन येणे.

उ. रिकाम्या जागा भर.

1. कृष्णपक्षातील ..... रात्र होती.

2. वैद्याच्या पत्नीच्या चेहऱ्यावर समाधानाचे ..... उमलले.

3. रक्षण करणं हे ..... काम आहे.

4. वैद्यकीय ज्ञान हे ..... सेवेसाठी आहे.

ऊ. नमुन्यात दाखविल्याप्रमाणे खालील शब्दांना प्रचलित उच्चारले जाणारे शब्द लिही.

नमूना : वैद्य - डॉक्टर

मेज -

लेखणी -

तसबीर -

भ्रमणध्वनी -

शस्त्रशल्य विशारद -

अग्निरथ विश्रामधाम -

दूरवाणी -

दूरदर्शन -

दिनदर्शिका -

*** उपक्रम:**

'परोपकाराचे फळ' यावर तुला माहीत असलेली कथा लिही.

हे ही माहीत असू दे -

खालील शब्द प्रत्येकी पाच वेळा जसेच्या तसे लिही -

1. व्यंग्यचित्र 2. गृहपाठ 3. अनुग्रह

4. किल्मिष 5. विदूषक

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

भाष्याभ्यास

केवल-प्रयोगी अव्यय

खालील वाक्यांचे वाचन कर

1. अहाहा! किती सुंदर गाणे आहे.
2. अरेरे! गाडी खाली सापडला की रे तो!
3. अबब! केवढी उंच इमारत ही!
4. हॅट्! त्याला कोण किंमत देते !

वरील वाक्यात अहाहा, अरेरे, अबब, हॅट या शब्दांचा वाक्यातील इतर शब्दांशी परस्पर संबंध दाखवित नाहीत, परंतु त्या वाक्यांचा प्रभाव वाढविण्यास त्यांची मदत होते. त्या शब्दांमुळे बोलणाऱ्याच्या मनातील भावना व्यक्त होतात. जे अव्यय मनातील भावना व्यक्त करतात त्यांना केवल प्रयोगीअव्यय किंवा उद्‌गारवाचक शब्द असे म्हणतात. मनातील व्यक्त होणाऱ्या भावनांनुसार केवल प्रयोगी अव्ययांचे होणारे प्रकार उदाहरणासह दिले आहेत त्यांचा अभ्यास कर.

1. आनंददर्शक - वा, वावा, वाहवा, अहाहा, ओहो.
2. शोकदर्शक - अरेरे, आईगं, हायहाय, ऊ.
3. आश्चर्यकारक - आँ, ओहो, अबब्, अरेच्या, अहाहा.
4. प्रशंसादर्शक - शाब्बास, वाहवा, छान, भले.
5. संमति दर्शक - हां, जी, जीहां, ठीक, बराय, अच्छा.
6. विरोधदर्शक - छे, छेछे, छट्, हॅट, अहं, ऊहूं.
7. तिरस्कार दर्शक - धिक्, हट्, शी ऽऽ, हत्, हुडुत.
8. संबोधन दर्शक - अरे, अग, अहो, ए
9. मौनदर्शक - चुप, चिप, गप, गुपचूप, चिपचाप

स्वाध्याय

वरील केवलप्रयोगी अव्ययांचा वापर करुन दहा वाक्ये लिही.


NOT TO BE REPUBLISHED © KTBS

9. आम्ही टिकलो तर तुम्ही टिकाल!

C5A1F6

- संग्रहित नाट्यप्रवेश

निवेदकः आज आपल्यासमोर पर्यावरणाच्या अनेक समस्या उभ्या आहेत. त्यातून पार होणे आवश्यक आहे. याची काळजी आकाश, सूर्य, वारा, पृथ्वी, पाणी या पंच महाभूतांना देखील लागली आहे. त्याबाबत त्यांची चर्चा चालली आहे. तेव्हा चला आपण त्यांची चर्चा ऐकू.



NOT TO BE REPUBLISHED

समुद्र : काय गं सरिते, हल्ली तू फारच रोडावत चालली आहेस?

नदी : काय करु सागरा, आमच्या नशिबाचे भोग आहेत.

समुद्र : अशी निराश का झालीस तू?

नदी : मला काळजी लागली आहे की मी आणखी काही वर्षांनी टिकते की .... नाही म्हणून.

समुद्र : अग वेडे, तू, मी, ओढे, तलाव, आकाश, सूर्य, हा वारा, ही पृथ्वी आम्ही.... सगळे निसर्ग निर्मितच आहोत आम्हाला काय होणार?

वारा : हे रत्नाकरा, तू अजून कुठल्या युगात आहेस?

समुद्र : का रे बाबा?

वारा : हे मला विचारायच्या आधी त्या पृथ्वीला विचार.

पृथ्वी : आमच्यात सुंदर कोण ते सांग, सागरा.

समुद्र : अर्थातच तू.

पृथ्वी : मग हे पवनराजा सांग मी सुंदर का दिसते?

वारा : हिरवीगार झाडे, वेली, उंच उंच पर्वत, स्वच्छ ओढे, सरोवरे, नद्या, सागर हे तुझ्यावर दागिन्यासारखे सजले आहेत म्हणून सुंदर दिसतेस.

पृथ्वी : मग सरिते, तू सांग ह्या पृथ्वीवर बुद्धिमान गणला जाणारा प्राणी कोण आहे?

नदी : अर्थात मानव, त्याच्याशिवाय आहे कोण?

पृथ्वी : मग, आता मी पूर्वीसारखी सुंदर आहे का?

नदी : तू नाहीस आणि मी पण नाही.

पृथ्वी : मग पवनराजा, तू सांग याला जबाबदार कोण?

वारा : याला देखील जबाबदार मानवच.

समुद्र : ते कसं काय?

पृथ्वी : मानवाने वास्तव्य करायला सुरुवात केल्यानंतर त्याला मी जागा दिली. ह्या वायुराजाने स्वच्छ हवा दिली. ओढयांनी, नद्यांनी सरोवरांनी स्वच्छ पाणी दिले, वृक्षांनी त्याला निवारा बनवायला मदत केली बरोबर आहे ना?

समुद्र : अगदी बरोबर, तर मग?

पृथ्वी : ती एक म्हण आहे ना, ''भटाला दिली ओसरी आणि भट हातपाय पसरी'' त्यानुसार मानवाने माझ्यावर हळूहळू अन्याय करायला सुरुवात केली.

समुद्र : मला नाही समजलं.

सूर्य : अरे अर्णवा, असा कसा रे तू? मानवाची लोकसंख्या वाढली?

समुद्र : होय वाढली

सूर्य : त्याच्या गरजा वाढल्या, विकासाच्या नावाखाली त्याने झाडं तोडली, डोंगर सपाट

NOT TO BE REPUBLISHED © RTBS

केले, मोठमोठी धरणं बांधली. रहायला घरे पाहिजेत म्हणून उंच उंच इमारती बांधल्या, कारखाने सुरु केले, मोठ मोठे रस्ते तयार केले आणि या वसुंधरेला त्यांनी कुरुप बनविले.

नदी : आणि आता हाच मानव शहरातील सांडपाणी, कारखान्यातील दूषित रसायन मिश्रित पाणी सगळं माझ्यात आणून सोडतो.

समुद्र : मला तरी मानवानं कोठे सोडलंय? माझ्या किनाऱ्यावर मोठी शहरं उद्योगधंदे आहेत. त्यांची घाण, माझ्यातच नद्यांचं दूषित पाणी आणि आता तर काय अणुप्रकल्पांचं पाणी माझ्यातच. त्यामुळे मी देखील दूषितच. त्यामुळे माझ्यात सामावलेली सजीव सृष्टी देखील नष्ट होत चालली आहे.

पृथ्वी : आता समजल का तुम्हाला, माझा या मानवावर का राग आहे ते?

वारा : होय, पूर्वी मी कसा हिरव्यागार वनराईतून, लहानमोठ्या डोंगरदऱ्यातून स्वच्छंदाने वावरायचो. आता वनराई कमी झाली. हजारो कारखाने, लाखो वाहने, त्यातून बाहेर पडणारा धूर, दूषित पदार्थांची दुर्गंधी यामुळे माझा जीव गुदमरतो. त्यात आणखी भर ध्वनिप्रदूषणाची, शांतता म्हणून नाही.

समुद्र : मला वाटतं आमच्यात जर सुखी कोण असेल तर ते आहे आकाश.

आकाश : मी तुमचं बोलणं सुरुवातीपासून ऐकत आहे. अरे मी तरी कुठे सुखी आहे? हे पवनराज, तू म्हणालास ना. धुरामुळे आणि प्रदूषणामुळे जीव गुदमरतो म्हणून मग मला सांग पृथ्वीवरील धूर, प्रदूषित हवा, उष्णता हे सर्व कोठे जाते?

वारा : अर्थात तुझ्याचकडे आकाशा.

आकाश : मग तुला माहीत आहे ना माझे आवरण बनले आहे ते ओझोनचे आहे?

वारा : होय त्या ओझोनच्या आवरणामुळे तर आम्हाला तसेच सर्व सजीवांना पृथ्वीवर राहणे सुसह्य होते.

आकाश : मग आता ऐक. या ओझोनच्या आवरणाची जाडी दिवसेंदिवस कमी होत आहे.

नदी : अरे बापरे ! ती कशी काय?

आकाश : पृथ्वीवर प्रदूषण वाढतंय.

नदी : तेच तेच तू आम्हाला सांगू नकोस.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

आकाश : माझं ऐक तर आधी. शेतीसाठी पाहिजे म्हणून तुझ्याच काठावर राहून शेतकरी यंत्राच्या सहाय्याने पाणी खेचून घेतात.

नदी : अगदी बरोबर.

आकाश : शहरात, तसेच जिथे नद्या-सरोवरं नाहीत त्या ठिकाणी जमीन पोखरुन कूपनलिकेव्दारे जमिनीतील पाणी काढून घेतात.

पृथ्वी : अगदी आक्टोपससारखे खेचून घेतात.

आकाश : त्यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी कमी झाली आहे. पावसाचे प्रमाण कमी झाले आहे. हवेतील उष्णता वाढलेली आहे, त्यात भर म्हणजे शस्त्रास्त्र स्पर्धेच्या मागे लागून देशादेशातून होणाऱ्या अणू आणि क्षेपणास्त्राच्या चाचण्या, अंतराळात सोडले जाणारे कृत्रिम उपग्रह या सर्वांचा परिणाम माझ्यावर होत आहे.

सूर्य : त्यामुळे माझ्यातील अतिनील किरणांचा परिणाम वाढून पृथ्वीवरील तापमान वाढत आहे. यालाच मानवाने गोंडस नाव दिलंय 'जागतिक तापमान'

पृथ्वी : होय सूर्य नारायणा, मला आणि माझ्यावर वास्तव्य करुन राहणाऱ्या निष्पाप लहान मोठ्या प्राण्यांना, पक्ष्यांना तसेच बऱ्याच प्रमाणात मानवाला सुध्दा त्याचे परिणाम भोगावे लागत आहेत.

वारा : त्याच्याच परिणामाने एका भागात वादळ आणि अतिवृष्टी होतेय तर एका भागात अनावृष्टी.

पृथ्वी : तेवढेच कशाला, ध्रुवावरील हिमनग वितळायला लागलेत. भूकंपाचे प्रमाण वाढले. त्सुनामीसारख्या घटना होऊ लागल्या आहेत. त्यामुळे होणाऱ्या हानीला प्रमाण नाही.

वारा : हे नारायणा, यावर काही उपाय आहे की नाही ?

सूर्य : आहे ना आणि तोही मानवाच्याच हातात आहे.

समुद्र : मानवाच्या हातात ! तो कसा काय ?

सूर्य : मानवाने अण्वस्त्रस्पर्धा रोखली पाहिजे. वनसंपत्ती वाढवून पृथ्वीला तापमानवाढीपासून वाचवलं पाहिजे. प्रदूषण आणि लोकसंख्यावाढीवर नियंत्रण ठेवले पाहिजे. आवश्यक तितकाच पाण्याचा वापर केला पाहिजे.

आकाश : मानव शहाणा आहे. त्याने आपल्या शक्तीचा वापर विनाशासाठी न करता सुख-समृद्धीसाठी केला तर मला आनंद वाटेल. दरवर्षी 22 एप्रिल हा जो 'वसुंधरा

@KTRS NOT TO BE REPUBLISHED

दिन' म्हणून साजरा करतात त्यात मीही आनंदाने सहभागी होईन.

सूर्य : मानवाने या वसुंधरेला टिकविले पाहिजे. त्यांने एवढ ध्यानात घेतलं पाहिजे की आम्ही टिकलो तरच तो टिकेल.

नवीन शब्दार्थ :

गणना करणे	-	अंतर्भाव होणे,	रोडावणे	-	बारीक होणे
कृत्रिम	-	मानव निर्मित,	रत्नाकर	-	समुद्र
हिमनग	-	बर्फाचे पर्वत,	पवन	-	वारा
वास्तव्य करणे	-	राहणे,	अर्णव	-	समुद्र
वनराई	-	जंगल,	वसुंधरा	-	पृथ्वी

सुसह्य - सहन करण्याजोगे

उपजीविका - उदरनिर्वाह, पोट भरण्यापुरते

स्वच्छंद - स्वतंत्रपणे, स्वतःच्या इच्छेनुसार

त्सुनामी - भूकंपामुळे समुद्रातून येणाऱ्या प्रचंड लाटा (मूळ जपानी शब्द)

आक्टोपस - आठ पायांचा सागरी प्राणी (हा प्राणी आपल्या भक्षाच्या शरीरातील फक्त रक्त शोषून घेतो.)

ओझोन - पृथ्वी-सभोवतालचे उंचावर पसरलेले प्राणवायूचे आवरण

समानार्थी शब्द :

सरिता - नदी, तटिनी, तरंगिणी

समुद्र - सागर, रत्नाकर, अर्णव

पृथ्वी - वसुंधरा, धरती, अवनी

वारा - पवन, अनिल, वायू

आकाश - गगन, अंबर, आभाळ

सूर्य - भास्कर, मित्र, रवी

अरण्य - वन, कानन, जंगल

स्वाध्याय

अ. खालील प्रश्नांची एक वाक्यात उत्तरे लिही.

1. समुद्र नदीला काय विचारतो?
2. समुद्र कोणाला सुंदर म्हणतो?

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

3. नदीच्या मते पृथ्वीवर बुद्धिमान कोण?
4. ओझोनची जाडी दिवसेंदिवस का कमी होत आहे?
5. जागतिक तापमान म्हणजे काय?
6. 'वसुंधरा दिन' आपण कधी साजरा करतो?

आ. खालील वाक्ये कोणी कोणाला उद्देशून म्हटली आहेत ते लिही.

1. ''आमच्या नशिबाचे भोग आहेत हे?''
2. ''आमच्यात सुंदर कोण?''
3. ''भटाला दिली ओसरी आणि भट हातपाय पसरी''.
4. ''होय, अगदी आक्टोपस सारखे खेचून घेतात''.
5. ''आहे की आणि तोही मानवाच्या हातात''.

इ. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिही.

1. पृथ्वी सुंदर का दिसते?
2. पृथ्वीवर मानवाने अन्याय कसा केला?
3. नद्या व समुद्र दूषित का झालेत?
4. वाऱ्याचा जीव कशामुळे गुदमरतो?
5. आकाशावर कोणकोणत्या घटकांचा परिणाम झाला आहे?

ई. शिक्षकांच्या मदतीने खालील म्हणी पूर्ण कर.

1. खाण तशी .....
2. खाई त्याला .....
3. गर्वाचे घर .....
4. चोराच्या मनात .....
5. दाम करी .....
6. भटाला दिली .....

उ. उदाहरणात दर्शविल्याप्रमाणे जोडशब्दानी रिकाम्या जागा भर.

(उदा : उद्योगधंदा, सांडपाणी, झाडेझुडपे, डोंगरदऱ्या)

1. ..... भेट
2. ..... ठीक
3. ..... मस्करी
4. ..... बगीचा
5. सगे .....
6. मेवा .....
7. मान .....
8. दाग .....

✻ उपक्रम: शालेय कार्यक्रमात वरील नाटयकृती सादर कर.

हे ही करुन पहा -

खालील शब्द प्रत्येकी पाच वेळा जसेच्या तसे लिही -

1. मनीषा
2. पोशाख
3. शुश्रूषा
4. उ:शाप
5. अंगुष्ठ

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

10. वाच पुस्तके



अविनाश ओगले (जन्म 20-02-1957, मृत्यु 01-10-2012)

बेळगावचे रहिवासी. शब्दगंध काव्यमंडळाचे माजी अध्यक्ष. थेंब टपोरे, काजवा, रंग मनाचे हे यांचे कविता संग्रह. बालकविता, विडंबन काव्य, गझल आणि चारोळ्या यांचे लेखन. विविध मराठी काव्यसंमेलने तसेच बहुभाषिक काव्यसंमेलनात सहभाग. 'मिशन चॅम्पियन' या मराठी चित्रपटाचे गीतलेखन. सिंडिकेट बँकेत नोकरी करता करता त्यांनी काव्यलेखनाची आवड जोपासली.

(प्रस्तुत कवितेत त्यांनी पुस्तकवाचनाचे महत्व सांगितले आहे.)

जगण्याचे जर भान पाहिजे, वाच पुस्तके।
जगती जर सन्मान पाहिजे, वाच पुस्तके।
ग्रंथांवाचून अर्थहीन हे अवघे जीवन।
जिंदगीत जर जान पाहिजे, वाच पुस्तके।
संस्कारांनी घडतो माणूस, मोठा होतो।
मानाचे जर पान पाहिजे, वाच पुस्तके।
सहा रिपूंच्या हल्ल्यापासुन वाचवणारा
हृदयी जर भगवान पाहिजे, वाच पुस्तके।
आयुष्याच्या रुक्ष कोरड्या वाटेवरती
हिरवे जर तुज रान पाहिजे. वाच पुस्तके।
स्वत्व, संस्कृती, मायमराठी हवी जपाया
मातीचा अभिमान पाहिजे, वाच पुस्तके।

कवी - अविनाश ओगले

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

नवीन शब्दार्थ :

जगती	-	जगामध्ये
सन्मान	-	मान
जिंदगी (हिंदी शब्द)	-	जीवन
रुक्ष	-	कोरडे
सहा रिपू	-	(षड्रिपू) - काम, क्रोध, लोभ, मोह, मत्सर, मद
सन्मान	-	मान
रिपू	-	शत्रू
स्वत्व	-	स्वाभिमान

स्वाध्याय

अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

1. माणूस कशाने घडतो?
2. जीवन अर्थहीन केव्हा होते?
3. माणसाचे सहा शत्रू कोणते?
4. समाजाचा अभिमान राखण्यासाठी काय केले पाहिजे?
5. मातीचा अभिमान राखण्यासाठी काय जपले पाहिजे असे कवी म्हणतो?
6. शेवटी कवी कोणता संदेश देत आहे?

आ. तीन ते चार वाक्यात उत्तर लिही

1. कवीने या कवितेमध्ये पुस्तकांच्या वाचनाचे महत्व कसे वर्णन केले आहे?

इ. कशासाठी काय?

1. जगण्याचे जर भान पाहिजे .....
2. .....
3. .....
4. .....
5. .....
6. .....

} वाच पुस्तके

ई. तुमच्या शब्दात उपयोग करून वाक्ये लिही.

1. सन्मान 2. संस्कार 3. संस्कृती 4. भावना 5. स्वत्व

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

11. गोड गाणी



या लाडक्या मुलांनो

या लाडक्या मुलांनो तुम्ही मला आधार
नव हिंदवी युगाचे तुम्हीच शिल्पकार ॥ध्रु॥
आईस देव माना वंदा गुरुजनांना
जगी भावनेहुनी त्या कर्तव्य थोर जाणा
गंगेपरी पवित्र ठेवा मनी हा विचार॥1॥

शिवबा परी जगात दिलदार शूर व्हावे
टिळकांपरी सदैव ध्येयास त्या पुजावें
जे चांगले जगी या त्याचा करा स्वीकार ॥2॥

शाळेत रोज जाता ते ज्ञानबिंदू मिळवा
हृदयांत आपुल्या त्या देशाभिमान ठेवा
कुलशील मान राखा ठेवू नका विचार॥3॥

©KTRS NOT TO BE REPUBLISHED

स्वार आणि सावळ्या

सावळ्या : खबरदार जर टाच मारुनी जालपुढं चिंधडया-
उडविन राइ राइ एवढया ॥धृ॥
कुण्या गावचे पाटील आपण कुठें चालला असे
शीव ही ओलांडुनि तीरसे?
लगाम खेंचा हा घोडीचा राव टांग टाकुनी
असे या तुम्ही खडया अंगणी !
पोर म्हणूनी हसण्यावारी वेळ नका नेंऊ ही
मला का ओळखलें हो तुम्ही?
हा मर्द मराठयाचा मी बच्चा असे,
हें हाडहि माझे लेचेंपेचें नसे
या नसानसांतुन हिंमतबाजी वसे

खबरदार जर टांच मारुनी जाल पुढे,
चिंधडया-उडविन राइ राइ एवढया! ॥1॥

स्वार : मळयात जाउन मोटेचे ते पाणी धरावे तुवां
कशाला ताठा तुज हा हवा?
मुठींत ज्याच्या मूठ असे ही खड्गाची तो बरें
वीर तू समजलास काय रे?
थोर मारसी अशा बढाया पराक्रमाच्या जरी
कुठ तव भाला बर्ची तरी?
हें खड्गाचे बघ पाते किती चमकते
अणकुचीदार अति भाल्याचे टोक ते
यापुढे तुझी वद हिंमत का राहते?
खबरदार जर पाऊल पुढे टाकशील चिंधडया -
उडविन राई राई एवढया! ॥2॥

सावळ्या : आपण मोठे दाढीवाले अहां वीर बायकी
किती ते आम्हाला ठाउकी।
तडफ आमुच्या शिवबाजीची तुम्हां माहिती न का ?
दावितां फुशारकी कां फुका?
तुम्हासारखे असतील किती लोळविले नरमणी
आमुच्या शिवबानें भर रणी
मी असें इमानी चेला त्यांचेकडे
हुकमाविण त्यांच्या समजा याचे पुढें
देईन न जाऊं शूर वीर फाकडे
पुन्हा सांगतो खबरदार जर जालपुढें, चिंधडया
उडविन राइ राइ एवढया! ॥3॥

© BOOKS NOT TO BE REPUBLISHED

लाल भडक ते वदन जाहले बाळाचे मग कसे
(स्वार परि मनी हळू का हसे?)
त्या बाळाच्या नयनी चमके पाणी त्वेषामुळें
स्वार परि सौम्य दृष्टिने खुले
चंद्र दिसे एक जणूं दुसरा तपतो रवि का तर
ऐका शिवबाचे हे स्वर
''आहेस इमानी माझा चेला खरा
चल इनाम घे हा माझा शेला तुला
पण बोल सावळ्या पुन्हां बोल एकदा
''खबरदार जर टांच मारुनी जाल पुढे, चिंधडया-
उडविन राइ राइ एवढया! ॥4॥



@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

नव्या जगाची आण

(समुह नृत्यगीत)

तुझ्या कामामधुन, तुझ्या घामामधुन, उद्या पिकलं सोन्याचं रान
चल उचल हत्यार, गडया होउन हुशार
तुला नव्या जगाची आण।।ध्रु।।
तुझ्या घणाच्या घावामधुन, उठे उद्यांच्या जगाची आस
तुझ्या घामाच्या थेंबामधुन, पिके भुकेल्या भावाचा घास
तुझ्या ध्यासामधुन, तुझ्या श्वासामधुन
जुळे नव्या जगाचें गान।।1।।
तुझ्या पोलादी टांचेखालुन, जित्या पाण्याचे निघतिल झरे
तुझ्या लोखंडी दंडामधुन, वाहे विजेची ताकद कि रे
चल मारुं धडक, उभा फोडू खडक,
आता कशाची भूक तहान।।2।।
भाग्य लिहिलेलं माझं तुझं, घाम आलेल्या भाळावरी
स्वप्न लपलेलं माझं तुझं, इथं बरड माळावरी
घेऊन कुदळखोरं, चल जाऊं म्होरं,
देऊं देशाला जीवदान।।3।।




©KTBS NOT TO BE REPUBLISHED

12. शब्दखेळ

M5I8T8

1.खालील खेळात शिडी चढा किंवा साप तोंडाजवळ आल्यास खाली उतरा पण तुम्हाल आलेला वाक् प्रचार किंवा म्हण पूर्ण करा व तुमच्या वहीत लिहून काढा.



वाक्प्रचार	म्हणी
.....	.....
.....	.....
.....	.....
.....	.....

1. आधीच्या ओळीतल शेवटचा शब्द आणि पुढच्या ओळीतला पहिला शब्द रिकाम्या जागी भर. कविता पूर्ण कर. व कवी/कवयित्री हो.

सागर

सागराचं पाणी

पाणी निळंशार

निळंशार आकाश

आकाशात .....

सूर्याचे .....

किरणांचा .....

ताप करी .....

वाफ जाई .....

वर उंच .....

आभाळात .....

ढगाला वाजे .....

थंडीने कडकडती .....

मेघात शोभे विजेची .....

रेघ न रेघ घेई .....

पेटत देई ढगांना .....

रट्टे खाता ढग लागे .....

रडू कसंल पाऊस लागे .....

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED